
# अमृत कुंभ

परमपिता शिव परमात्मा



वर्ष १६ | अंक ४ | डिसेंबर २२ - जानेवारी २३ | मूल्य रु. १३/-



नाशिक (कलानगर) : कारागृह अधीक्षकांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. गोदावरी, ब्र.कु. वासंती व अन्य



वसंत नगर, नागपूर : शिवगंगा भवनचे उद्‌घाटन करताना ब्र.कु. रजनी, ब्र.कु. लता, ब्र.कु. मनीषा व अन्य.




गडचिरोली : आमदार डॉ. देवराव होली यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. कुंदा, ब्र.कु. सीता



डोंबिवली : बाल दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात विजेत्या बालकांचा सत्कार करताना ब्र.कु. शकु, भ्राता योगेश पाटील



तळेगाव दाभाडे : राजयोगाचा सप्ताह कोर्स झाल्यावर ग्रुप फोटोत NDRF चे जवान, ब्र.कु. प्रभा, ब्र.कु. मीना



मालाड (दिंडोशी) : दीपावली निमित्त आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध नृत्यांगना सुधा चंद्रन व भ्राता रवी यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. शोभा.

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १६, अंक ५. डिसेंबर २०२२ – जानेवारी २०२३




| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय – भगीरथाचे जीवन | २ |
| २. | नव युगाची चाहूल | ४ |
| ३. | ख्रिसमस | ५ |
| ४. | दृष्टी पलीकडची सृष्टी (भाग ३) | ८ |
| ५. | प्रकाशवाटा (भाग – २) | ११ |
| ६. | परमत्यागाच्या महामेरु राजयोगिनी संतरी दादीजी | १२ |
| ७. | व्यसनमुक्त व्हा (भाग – २) | १६ |
| ८. | परीकथा (भाग – ७) | १७ |
| ९. | "शिवबाबा : माझा पाठीराखा" (भाग – १) | १९ |
| १०. | माझे जीवन गाणे | २० |
| ११. | सप्तरंगी किरण (कविता) | २१ |
| १२. | तणावाचे कारण आणि निवारण | २२ |
| १३. | मनाचे खाद्य – ज्ञानमुरली | २४ |
| १४. | सेवावृत्त – १ | २५ |
| १५. | सेवावृत्त – २ | २७ |


## मुखपृष्ठाविषयी

सरत्या वर्षातल्या सुखद घटना आणि नव वर्षाच्या आगमनाची हुरहुर काही वेगळीच असते. जसे दिवस आणि रात्र हे एक चक्र आहे तसेच अध्यात्मात ब्रह्मदेवाचा दिवस आणि रात्र याचेही वर्णन आढळते. सृष्टीच्या सत्वगुणयुक्त कालखंडास ब्रह्मदेवाचा दिवस मानले तर तमोप्रधानता म्हणजे ब्रह्मदेवाची रात्र म्हणावी लागते. अज्ञानरूपी अंधकार दूर करण्यासाठी आणि पुन्हा दिवसाचा प्रकाश सृष्टीवर आणण्यासाठी शिवपरमात्म्याचे अवतरण झाले आहे. ज्यांच्या शरीराचा आधार घेऊन शिवपित्याने आपल्या ज्ञानाची ज्योत जगासमोर प्रकट केली त्यांना प्रेमाने सर्वजण 'ब्रह्माबाबा' म्हणत. ब्रह्माकुमारी संस्थेच्या साधकांसाठी जानेवारी महिना म्हटले की साकार बाबांच्या अर्थात ब्रह्माबाबांच्या आठवणी आवर्जून येतातच. नवयुगाकरिता ब्रह्माबाबांनी आपले जीवन एक आदर्श म्हणून जगासमोर ठेवले. त्यांच्याद्वारे शिवपित्याने आपले दिव्य गीताज्ञान उच्चारले. शिवपित्याच्या अलौकिक अवतरणाचे चित्ररूप दर्शन म्हणजे या अंकाचे मुखपृष्ठ होय.

– प्रकाशिका

**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)-४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.



संपादकीय ...

# भगीरथाचे जीवन

आपण अनेकांची चरित्रे वाचतो, ऐकतो. त्या चरित्रातील गुणसंपदेपैकी यथाशक्ती काही धारणही करतो. चरित्र किंवा जीवन हे महान, अलौकिकांचे असते, सामान्यांचे असते ते फक्त जगणे. मागील वर्षाच्या डिसे.-जाने. अंकात 'साकार बाबांच्या' जीवनातील अलौकिक नेतृत्त्व कलेवर आपण थोडासा विचार केला होता. त्याच लेखनाचा पुढील भाग म्हणता येईल, असे काही मुद्दे पाहू या.

ब्रह्माकुमारीज संस्थेची स्थापना ज्यांच्याद्वारे झाली त्या 'दादा लेखराज' यांना अलौकिक नाव 'ब्रह्माबाबा' असे प्राप्त झाले. शिवपरमात्म्याची शिकवण प्रत्यक्ष कर्मात आणणारे म्हणून 'साकारबाबा' हे बिरुदही सार्थ ठरते. नेता कुणाला म्हणावं याची व्याख्या अनेक अंगाने करता येईल. कुणी म्हणेल बोले तैसा चाले, निर्भय, कुशल संघटक असे अनेक पैलू असणारा तो नेता ! कुणी म्हणेल जो स्वत:प्रमाणे इतरांतही नेतृत्वगुण विकसित करतो, तो नेता. अशाच काही गोष्टींद्वारे साकार बाबांच्या जीवनात डोकावून पाहू या.

**<u>प्रोत्साहित करणे आणि सशक्तिकरण :</u>**

नेत्यामध्ये हा एक गुण मोठा ठशीव असावा लागतो. साकार बाबांच्या जीवनात तो पदोपदी आढळून येतो. अध्यात्माच्या मार्गावर चालताना खाच-खळगे, काटे-कुटे येणारच. जीवन म्हणजे एक सागरही आहे, त्यात छोट्या-मोठ्या लाटा एकामागून एक येणारच. ते अपरिहार्य आहे. साधकांच्या मनाची स्थिती अशा परीक्षांमुळे वर-खाली होऊ शकते. असे कोणी साधक जेव्हा बाबांच्यासमोर येत तेव्हा बाबा त्यांच्यातील गुणवैशिष्ट्यांचे प्रकट वर्णन करत. याद्वारे ती व्यक्ती पुन्हा एकदा नव्याने उभारी घेऊन आध्यात्मिक वाटचालीत अग्रेसर होत. कौतुक करण्यामागे बाबांची भूमिका दोन प्रकारे पहायला मिळे. १) जे या मार्गावर ढेपाळले आहेत, त्यांच्यात शक्ती वा जोम भरण्याकरिता बाबा प्रोत्साहनपर शब्द उच्चारत. २) ज्यांनी खरोखरीच श्रीमताचे पालन करून जीवनात काही परिवर्तन घडवले आहे. तसेच ईश्वरी सेवेत काही विशेष करून दाखविले आहे अशांचेही कौतुक करत. भ्राता जगदीशजी, संस्थेचे प्रमुख प्रवक्ता आणि लेखकही होते. त्यांनी आपल्या जीवनातील अनेक प्रसंगात बाबांच्या गुणांचे दर्शन घडल्याचे वर्णन केले आहे. त्यातील एक प्रसंगात असे घडले. शिवरात्र अगदी एका आठवड्यावर येऊन ठेपली होती. अशा वेळेस मधुबनहून बाबांनी, भ्राताजींना कळवले, 'मनुष्यमत आणि ईश्वरीमत' या विषयावर एक छानशी पुस्तिका छापली गेली पाहिजे. जगदीशभाईंनी होकार दिला; पण विचारले 'काय काय मुद्दे यात घ्यायला हवेत?' बाबांनी एक जंत्रीच त्यांच्या समोर ठेवली आणि म्हणाले, ''मनुष्याची मती पाच विकारांमुळे मलिन झाली आहे. त्यामुळे कुणाला काय रुचेल, कुणाला काय !'' सगळ्या मुद्द्यांचा विचार करता साधारण सत्तर पानांची पुस्तिका होईल असे दिसू लागले. जगदीशभाईंनी विचारले, ''बाबा हे कधीपर्यंत पूर्ण करायचे?'' बाबा म्हणाले, ''शिवरात्रीपूर्वी आपल्या सेवाकेंद्रावर अमुक अमुक संख्येत पुस्तिका गेल्या पाहिजेत.'' जनसामान्यांपर्यंत हा संदेश गेला पाहिजे ही कळकळ होती. हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांत छापायचे होते. सगळे पाहता केवळ तीन-चार दिवसात मजकूर लिहून, तपासून, छापून त्याचे वाटपही करायचे होते. एक प्रकारे ते शिवधनुष्यच होते. भ्राताजींनी देखील ते समर्थपणे पेलले. बाबांच्या आदेशानुसार सगळे घडलेदेखील. पण त्या दगदगीचा थोडासा शरीरावर परिणामही झाला. जगदीशभाईंना थोडा ताप आला. बाबा दिल्लीत आले होते; पण ते ठिकाण भ्राताजींपासून लांब होते. प्रकृती

अस्वास्थ्यामुळे भ्राताजी दुपारी आपल्या पलंगावर जरा लवंडले. इकडे बाबांना वाटले, जगदीशभाई (बाबा प्रेमाने त्यांना 'जगदीश बच्चा' म्हणत) कुठे आहे, इतकी छान सेवा करून कुठे गायब झाले? ज्या क्षणी जगदीशभाईंच्या प्रकृतीबद्दल कळले त्या क्षणीच बाबा उठले आणि म्हणाले, चला भेटायला जाऊ. काही वेळात बाबा जेव्हा भ्राताजींच्या निवासस्थानी पोहोचले तेव्हा त्यांच्या आश्चर्याला पारावारच राहिला नाही. "मी पलंगावरून उठून कधी बाबांच्या बाहूपाशांत विसावलो ते माझे मलाच कळले नाही" असे प्रेमाने ओथंबलेल्या शब्दात ते वर्णन करत. "माझा थकवा, ताप कुठे पळून गेला ते मलाही कळलं नाही" असं सांगताना त्यांच्या मनातले भाव काही केल्या लपत नसत.

या घटनेवर विचार करताना अनेक गोष्टी समोर येतात. कबीरांनी वर्णन केलंय, गुरु काय करतो, कशी परीक्षा घेतो? ते म्हणतात, "गुरु कुम्भार है, शिष (शिष्य) कुंभ है ।

घडी घडी काढै खोट
अंतर हाथ सहार दे
बाहर बाहै चोट"

म्हणजे गुरु-शिष्य नाते कुंभार आणि त्याच्या मडक्याप्रमाणे आहे. गुरुरूपी कुंभार घडणाऱ्या मडक्याला बाहेरून थापट्या मारतो, खडे दूर करतो म्हणजेच समोर आव्हाने उभी करतो. परीक्षा घेतो. हे करत असताना मात्र आतल्या बाजूने हात देऊन आकार द्यायलाही मदत करतो.

आजकालच्या मॅनेजमेंटच्या अंगाने जरी विचार केला तरी एक तत्त्व चटकन समोर येते. Encouragement (प्रोत्साहन) आणि Reward (कौतुक किंवा बक्षीस). एखाद्या कर्मचाऱ्याला कामासाठी प्रेरित करणे आणि चांगल्या कामाची शाबासकी देखील लगेच देणे. वार्षिक आढावा (ॲप्रायझल) घेताना कौतुक करणे नाही, तत्काळ! त्याचप्रमाणे बाबांनी जगदीश भाईंसमोर आव्हानही ठेवले आणि केलेल्या सेवेबद्दल कौतुक करताना क्षणाचाही विलंब लावला नाही.

**<u>सशक्तिकरण</u>** - Empowerment असा शब्द आजकाल बराच प्रचलित आहे. एखाद्या संघटनेत किंवा कारखान्यात लोकांना जबाबदारी दिली जाते आणि त्याचबरोबर ते कार्य निभावण्याकरिता योग्य प्रशिक्षण आणि ज्ञानही दिले जाते. त्याचप्रमाणे बाबांनीही सर्व माता-भगिनींना अनेक प्रकारचे प्रशिक्षण दिले. केवळ आध्यात्मिक ज्ञान नव्हे, तर ते कार्य व्यवहारात कसे आणायचे याचे प्रात्यक्षिकही दिले. १९३७च्या कालखंडात स्त्रिया म्हणजे चूल आणि मूल किंवा एक दुय्यम व्यक्ती असेच अनेक ठिकाणी प्रचलित होते. पुरुषप्रधान संस्कृतीचा मोठा पगडा सर्वत्र होता. अशा काळात बाबांनी माता-भगिनींना सर्व प्रकारची कामे करण्याचा अनुभव दिला. श्रीमंताघरच्या स्त्रिया घरातली काडीही इकडची तिकडे न करणाऱ्या, अशांना शेणाच्या गोवऱ्या बनविण्यापासून ते बस चालविण्यापर्यंत सर्व प्रकारचा अनुभव करविला. 'भारतातील स्त्रिया बस चालवितात' अशा स्वरूपाची बातमी त्याकाळी अमेरिकेत वर्तमानपत्रही झळकली होती. अगदी अलीकडच्या काळात गुलजार दादीजींनी सहजच एक उल्लेख केला होता - माझ्यासमोर आजही बिघडलेली सायकल कुणी आणून दिली, तर मी ठीक करून दाखवेन.

वाहन चालविणे असो, दुरुस्त करणे असो किंवा शिवणकाम असो. कुठल्याही कामात संस्थेतील माता-भगिनी उण्या नव्हत्या. १९०७ च्या सुमारास मादाम कामांनी जर्मनीत भारतीय स्वातंत्र्याविषयी प्रखर विचार जाहीर सभेत मांडले होते. त्यांच्यासारख्या इतरही काही तेजस्विनींनी देशसेवेत आपल्या बुद्धीची आणि ओजस्वी वाणीची चुणूक जगाला दाखविली होती. त्याचप्रमाणे पठडीतील शिक्षण फारसे नसतानाही ब्रह्माकुमारी बहिणींनी विकारांपासून स्वतंत्र होण्यासाठीचे ज्ञान आपल्या भाषणाद्वारे जगासमोर मांडले. १९५० ते १९६० च्या दशकात दादी प्रकाशमणी, दादी रत्नमोहिनींनी जपानमध्ये जाऊन जागतिक शांततेसाठी मनाची शांती कशी प्राप्त करता येईल हे सांगितले. यालाच सशक्तीकरणाचा सबळ पुरावा म्हणता येईल.

शास्त्र-पुराणात भगीरथाचे वर्णन येते. सगर (काही ठिकाणी सागर असाही उल्लेख येतो) नावाच्या राजाचे अनेक पुत्र होते. कुठल्यातरी शापाचा परिणाम म्हणून त्याच्या वंशातल्या अनेकांचे भस्म झाले. त्याच वंशपरिवारातील भगीरथाने घोर तपश्चर्या करून स्वर्गलोकीची गंगा पृथ्वीवर आणली. गंगेच्या पवित्र पाण्याचा स्पर्श झाल्यावर फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा राखेतून सागर राजाची पुत्रादि मंडळी जीवित झाली. तेव्हापासून कठोर परिश्रमांना भागीरथी प्रयत्न असे नाव पडले आणि गंगेचे एक नाव 'भागीरथी' झाले.

(पृष्ठ क्र.१० वर)



# नव युगाची चाहूल

प्रकाशिका ब्र.कु.डॉ. गोदावरी दीदी

सृष्टीचा नियमच आहे जुनं जातं नवं येतं. ऋतू बदलतात, दर तीनशे पासष्ट दिवसांनी नवे वर्ष येते. आपण सर्व जण उत्साहाने नवीन वर्षाचे स्वागतही करतो. आपल्यापैकी अनेक जण नव्या वर्षारंभाच्या निमित्ताने काही निश्चयही करतात. कुणी वजन घटविण्याकरिता आहाराविषयी नियम करतो, तर कुणी आपली बँकेतली ठेव वाढविण्याकरिता गुंतवणुकीचे उपाय योजतो. गेली दोन वर्षे साऱ्या जगाने एका वेगळ्याच वर्षारंभाचा अनुभव घेतला. आता त्याची आठवणही नको असे वाटते. पण सखोलपणे विचार केला तर गेल्या दोन-तीन वर्षातला काळ आपल्याला बरेच काही शिकवून गेला. उदाहरणच द्यायचे झाले, तर या कालावधीत आपण अचानक येणाऱ्या मोठ्या संकटास तोंड देण्याचा अनुभव नकळत पदरी घेतला. आरोग्याच्या दृष्टीने काही चांगल्या गोष्टी, नियम शिकलो, नियमित व्यायामाचे महत्त्व जाणले, वृद्धांना येणाऱ्या समस्या, ज्यांची मुले परदेशी किंवा आप्तेष्टांपासून लांब आहेत अशा पालकांना काय काय गोष्टींना सामोरे जावे लागते ते पहिले. मुलांच्या नव्या शिक्षण पद्धतीचे फायदे आणि तोटेही समोर आले. दोन वर्षांच्या ऑन-लाईन अभ्यासक्रमानंतर अनेक मुले लेखी परीक्षेला वर्गात जाऊन बसण्यास घाबरू लागली. हे एक नवे आव्हान शिक्षक आणि पालकांसमोर उभे ठाकले. चाकरमान्यांना घरून काम करणे सोपे वाटू लागले. काही प्रमाणात प्रदूषणाची मात्राही कमी झाली.

अर्थकारणाचा विचार केला तर अनेक उद्योगधंदे बुडले, डबघाईला आले. काही नव्या उद्योगांच्या संधी जन्माला आल्या. सगळंच नकारात्मक घडलं असं नाही. आपण या गोष्टी कशा पाहतो त्याला अधिक महत्त्व आहे. ही सगळी एका नव्या युगाची नांदी आहे का? आजपर्यंत मानवाने अनेक बदल पाहिले, सोसले; पण येऊ घातलेला काळ खूप वेगळा असावा असे वाटते. भौतिक साधनांची सुबत्ता अनेक ठिकाणी दिसते; पण मनाच्या सबलीकरणाचे काय? अनेक इस्पितळातही मनाच्या आरोग्यासाठी काही घडावं असं प्रखरतेने वाटू लागले आहे. मनाच्या सबलीकरणासाठी साधनेची आवश्यकता आहे.

मन-बुद्धी आणि संस्कार ही मनुष्यात्म्याची अभिन्न अंगे आहेत. मन-बुद्धीवर अंकुश मिळवणे हाच अध्यात्माचा उद्देश होय. यासाठी शिवपित्याने स्वतः येऊन आपले दिव्य ज्ञान प्रकट केले. त्या दिव्य ज्ञानाद्वारे आपण मन-बुद्धीवरचे नियंत्रण कसे प्राप्त करायचे ते शिकू शकतो. याकरिता राजयोगाचे प्रशिक्षण आवश्यक आहे. परमेश्वर निराकार आहे हे अनेक धर्मात, अनेक पंथात मानले गेले आहे. निराकार परमेश्वर सृष्टीवर येऊन आपल्या मुलांशी म्हणजेच मनुष्यात्म्यांशी संवाद कसा साधणार? याकरिता त्याने आपले साकार माध्यम निवडले. 'दादा लेखराज' या सिंध प्रांतातल्या हिरे-जवाहिऱ्याच्या व्यापाऱ्यास काही साक्षात्कार झाले. त्यातून त्यांना वैराग्याची ओढ लागली. त्यांनी माता-भगिनींचे विश्वस्त मंडळ स्थापून आपले सर्व वैभव त्यांच्या स्वाधीन केले. कालौघात त्यांना कर्तव्यवाचक नाव दिले गेले 'प्रजापिता ब्रह्मा'. पितृवत सर्वांवर त्यांनी प्रेम केले म्हणून त्यांना 'ब्रह्माबाबा' असे प्रेमाने म्हटले जाऊ लागले. शिवपित्याच्या आदेशानुसार त्यांना नव युगाची चाहूल लागली. येणारा काळ हा सृष्टीपरिवर्तनाचा आहे. मानव एकेकाळी देवतुल्य होता. त्याच्या अंगी दैवी गुण होते म्हणून त्यास देव-देवता असे संबोधले जाई. काळाच्या ओघात जन्म-मृत्यूच्या चक्रात दैवी गुण लोप पावले आणि मानव आपले देवत्व हरवून बसला. पुन्हा अशा दैवी सृष्टीची

(पृष्ठ क्र.१० वर)



# ख्रिसमस

ब्र.कु. छाया, मुलुंड (पूर्व)

ख्रिसमस म्हणजे ज्याला मराठी मध्ये 'नाताळ' सण असे म्हणतात. दरवर्षी '२५ डिसेंबर' रोजी साजरा केला जातो. हा सण दरवर्षी येशु ख्रिस्तांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. ख्रिस्ती पौराणिक कथांमध्ये येशु ख्रिस्तांची 'देवाचा संदेशपुत्र (मसिहा) म्हणून उपासना केली जाते. त्यामुळे त्यांचा वाढदिवस हा ख्रिश्चनांमध्ये सर्वात आनंददायी समारंभ आहे. जरी हा सण प्रामुख्याने ख्रिश्चन धर्माचे अनुयायी साजरा करत असले, तरी हा जगभरातील सर्वात आनंददायी सणांपैकी एक आहे. ख्रिसमस आनंदाचे आणि प्रेमाचे प्रतीक आहे. केवळ पाश्चात्त्य देशांतच नाही तर भारतातही वेगवेगळ्या प्रांतात मोठ्या उत्साहाने हा सण साजरा होतो. भारत प्रत्येक धर्माची संस्कृती आणि परंपरा सांभाळणारा देश आहे. भारतातील आदि संस्कृती दैवी संस्कृती ही सभ्यतापूर्ण, स्नेहपूर्ण एकतेने नटलेली दिव्य संस्कृती आहे.

भारतातील सुवर्णकाळात म्हणजेच आदि सनातन देवी-देवता धर्मात प्रत्येक क्षण हा उत्साहाने भरलेला होता; परंतु द्वापरयुगानंतर एका धर्माची संस्कृती अनेक धर्मांमध्ये विभागली गेली. आता तेच उत्साहाचे सीमित रूप म्हणून वर्षातील काही दिवस उत्सव किंवा सण साजरे केले जातात. त्यातीलच ख्रिश्चन धर्मातील एक सण उत्साहाचे प्रतीक म्हणजेच 'नाताळ'. दिवाळीप्रमाणेच हा सणदेखील पूर्ण आठवडा साजरा केला जातो.

डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात म्हणजेच एका वर्षाचा शेवट आणि नवीन वर्षाचा आरंभ या कालावधीमध्ये मोठ्या उत्साहाने, जल्लोषाने हा सण साजरा केला जातो. नाताळ म्हणजे ख्रिश्चन बांधवांचा मोठा दिवस. या दिवसापासून रात्र लहान व दिवस मोठा होत जातो. द्वापरयुगातील मधल्या काळामध्ये ख्रिश्चन धर्माचा आरंभ झाला. या धर्माचे संस्थापक 'येशू ख्रिस्त' होत. बायबलमध्ये लिहिले आहे, येशू हा परमेश्वराचा पुत्र आहे. ईश्वराचा प्रेषित आहे. पाश्चात्त्य देशांतील तो काळ म्हणजे जिथे मानवता लोप पावू लागली होती. निर्घृणता, असत्यता, हिंसाचार, निष्ठूरता यांमुळे मानवातील मानवता लोप पावू लागली होती. अशावेळी येशू ख्रिस्त यांनी तेथील मानव जातीला दया, प्रेम, सत्यता, करुणा या गुणांची पुन्हा जागृती करून एक श्रेष्ठ मानव तयार व्हावा म्हणून आपले संपूर्ण जीवन या कार्याला वाहिले. त्यांनी प्रत्येक मानवाला ईश्वराच्या समीप जाण्यासाठी अनेक नीती-सिद्धान्त सांगितले. परमेश्वरावर प्रेम करा, प्रत्येक मानवावर प्रेम करा कारण प्रेम हेच परमेश्वर आहे ही शिकवण त्यांनी तेथील मानवांमध्ये रुजवली. येशूंच्या या शिकवणीचे साधर्म्य 'श्रीमद् भगवतगीतेत आढळते. श्रीमद् भगवतगीतेमध्ये परमेश्वराने संपूर्ण मानवजातीला उपदेशून जे काही सिद्धान्त सांगितले आहेत, त्यातील काही सिद्धान्त जसे प्रेम, दया, करुणा, सत्यता येशूंनी पण आपल्या जीवनात आचरणात आणले आणि ही शिकवण तेथील बांधवांमध्ये रूजवली. त्यांच्या जाण्यानंतर त्यांच्या मागे अनुयायांनी ही शिकवण एका ग्रंथात नमूद केली त्याला 'बायबल' असे म्हणतात. त्यानंतर येशू ख्रिस्त यांच्या नावाने त्यांच्या अनुयायांनी स्वत:ला 'ख्रिश्चन' धर्माचे असे संबोधले आणि ख्रिश्चन धर्म स्थापन झाला.

काहींच्या मते बायबलमध्ये देखील लिहिले गेले आहे की, येशू ख्रिस्त यांच्या जन्माच्या ३००० वर्षांपूर्वी भारत स्वर्ग होता. भारत अखंड देश होता. दैवी संस्कृतीचे राज्य होते. प्रत्येक गोष्ट मुबलक व संपन्न होती. राजकुमार श्रीकृष्ण व राजकुमारी श्रीराधा यांचेच स्वयंवरानंतरचे रूप म्हणजे महाराजन श्री नारायण, महाराणी श्रीलक्ष्मी, जे ऐश्वर्यसंपन्न

भारताचे मालक होते. परंतु कालचक्रातील फेऱ्यानुसार द्वापरयुगाला सुरुवात झाली आणि श्रेष्ठ, संपन्न दैवी भारताचं चित्र हळूहळू लोक पावत गेले. आज अखंड भारतातील सर्व संपत्ती पाश्चात्त्य देशांतील बांधवांनी आपल्याकडे बुद्धी बळाने एकत्र करून संपूर्ण जगात आपले अधिकार स्थापन केले. धर्मस्थापकाच्या शिकवणुकीचा काळाच्या ओघात विपर्यास होत गेला.

त्यामुळे आज प्रत्येक मानव विकृत कर्म करत आहे. या विकृतींमुळे विनाशाचे पडसाद दिसू लागले. येशू ख्रिस्तांसारख्या अनेक मानवांनी जन्म घेऊन समाजाला सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु आजचे समाजाचे चित्र दिवसेंदिवस खालावले गेले आहे असेच दिसते. अशावेळी दैवी संस्कृतीची पुन्हा स्थापना करण्यासाठी कलियुगाचा शेवट आणि सत्ययुगाची सुरुवात याच्या मधल्या काळात सृष्टीवर म्हणजे संगमयुगामध्ये परमेश्वराला अवतरित व्हावे लागते. त्याचे हे सूचक म्हणून 'नाताळ' हा सणसुद्धा एका वर्षाचा शेवट आणि नवीन वर्षाची सुरुवात याच्या मधल्या कालावधीमध्ये साजरा केला जातो.

नाताळ या सणात प्रामुख्याने घराघरात दिव्याची आरास केली जाते. प्रत्येक चर्चमध्ये येशूंच्या पुतळ्याजवळ अनेक मेणबत्त्या प्रज्वलित केल्या जातात. या दिवसाचे खास महत्त्व म्हणजे 'ख्रिसमस ट्री'ची सजावट या दिवशी केली जाते. सांताक्लॉज नावाचा संत मुलांसाठी अनेक प्रकारच्या भेटवस्तूंचे वाटप करतो, त्यात मिठाई, चॉकलेट, खेळणी अशा विविध वस्तू असतात. एकमेकांना ख्रिश्चन बांधव शुभेच्छा कार्ड देतात. घराघरात मिठाई खाणे आणि इतरांना देणे. तोंड गोड करणे, नवीन कपडे घालणे, घरांची सजावट करणे अशा अनेक गोष्टींना महत्त्व दिले जाते.

या सगळ्यांमागील गूढ आध्यात्मिक सत्य, ज्ञानयुक्त रहस्य आपण जाणून घेऊन त्याचा उलगडा ईश्वराच्या सृष्टीवरील अवतरणाबरोबर उलगडत गेला तो असा.....

ख्रिसमस वृक्ष – 'नाताळच्या दिवशी या वृक्षाला अनेक प्रकारे सजवले जाते. हे वृक्ष इतर झाडांपेक्षा दिसायला वेगळे असतात. झाडाची रचना निमुळती असते, फांद्या भूमीकडे झुकलेल्या असतात. ख्रिसमस वृक्षावर एक मोठा तेजोमय तारा दाखवतात व छोट्या छोट्या दिव्यांनी झाड सजवले जाते. झाडावरती फरिश्ते (देवदूत) यांचेही चित्रण केलेले असते. या झाडाखाली अनेक भेटवस्तूदेखील ठेवल्या जातात. या वृक्षामागील गूढता अशी आहे – संपूर्ण मानवसृष्टीरूपी कल्पवृक्षाची आठवण करून देणारे हे एक सूचक आहे. संपूर्ण मानवसृष्टीरूपी वृक्षाचा इतिहास यात दडला आहे. ज्या कल्पवृक्षाचे वर्णन गीतेच्या १५ व्या अध्यायात पहिल्या श्लोकात आले आहे. उर्ध्वमूलमधः शाखम् – म्हणजे ज्याचे बीज वर व फांद्या खाली आहेत. फांद्या पृथ्वीच्या दिशेने निमुळत्या आहेत. बीज म्हणजे परमात्मा, ईश्वर जो सर्व आत्म्यांचा पिता आहे. परमपिता परमात्म्याचे निवासस्थान परमधाम म्हणजे उंच ठिकाणी आहे व त्यांच्याद्वारे स्थापन होणारे मनुष्यसृष्टीरूपी झाड म्हणजे रचना ही पृथ्वीवर आहे. म्हणून हा वृक्ष उलटा दाखवला आहे. ख्रिसमस वृक्षाच्या सर्वांत वरच्या भागावर एक मोठा लखलखता तारा दाखवला जातो. ते परमात्म्याचे प्रतीक आहे. कारण परमात्म्याचे सत्यस्वरूप हे निराकार ज्योतिस्वरूप आहे. बाकीचे लहान-लहान दिवे किंवा लखलखते तारे ज्यांच्यांद्वारे संपूर्ण वृक्षाला सजवले जाते. ते छोटे-छोटे तारे किंवा दिवे म्हणजे सृष्टीवरील सर्व मानव आत्म्यांचे प्रतीक आहे. परमात्मा सृष्टीचा रचयिता असल्यामुळे त्याचे स्थान झाडाच्या वरती व बाकी दिवे म्हणजे ईश्वराची रचना म्हणून त्यांचे स्थान झाडांवरच्या पानांमध्ये दाखवले आहे. म्हणजेच त्यांचे स्थान झाडांवरच्या पानांमध्ये दाखवले जाते. म्हणजेच परमात्मा सृष्टीरूपी झाडाचा रचयिता आहे. या झाडावर 'फरिश्ते' (देवदूत) दाखवले जातात. हे फरिश्ते म्हणजेच परमेश्वराची सर्वश्रेष्ठ रचना, सृष्टीची आदि रचना ज्यांच्याद्वारे दैवी सृष्टीच्या रचनेचे कार्य ईश्वर करतो. हे श्रेष्ठ आत्मे म्हणजे फरिश्ते या संपूर्ण वृक्षाची शोभा आहे. ज्यांनी आपल्या श्रेष्ठ कर्मांनी, श्रेष्ठ धारणेने ईश्वराला मदत केली. त्यांना आज समाजात पूज्य म्हणून स्थान दिले जाते.

**सांताक्लॉज** – लाल आणि पांढरा पोषाख परिधान केलेला हा सांताक्लॉज ज्याला क्रिसमस फादर असेही म्हटले जाते. नाताळच्या दिवशी याचे खूप महत्त्व आहे. आकाशाच्या मार्गाने येणारा हा सांताक्लॉज आपल्याबरोबर अनेकानेक भेटवस्तू घेऊन येतो आणि त्या ख्रिसमस वृक्षाच्या खाली ठेवतो, असे म्हणतात की, या भेटवस्तू कधीही न संपणाऱ्या अक्षय आहेत. या भेटवस्तू लहान मुलांसाठी एक आनंदाचा खजिना असतो. म्हणून सांताक्लॉज यांच्या आगमनाला या दिवशी खूप महत्त्व दिले जाते. या सांताक्लॉजचा येशू ख्रिस्त

यांच्या जन्माशी तसा काही संबंध नाही आणि आजवर याला प्रत्यक्षात कोणी पाहिलेही नाही. मग कोण आहे हा सांता ? जो अनेक प्रकारच्या भेटवस्तूंचे वाटप करतो. त्या अक्षय भेटवस्तू म्हणजे तरी नेमक्या कोणत्या? ज्या चिरकाल सुखशांति आणि संपन्नता देतात. यातील आध्यात्मिक रहस्य असे आहे की हा न दिसणारा सांता म्हणजे परमात्म्याचे गुप्त रुपात सृष्टी स्थापन करण्यासाठी अवतरित होणे. सांताक्लॉजच्या पोषाखातील लाल रंग हा परमधामाचे प्रतीक आहे व पांढरी छटा ही प्रकाश स्वरुप शिवपरमात्म्याचे प्रतीक आहे. शुभ्र दाढीधारी वृद्ध व्यक्ती म्हणजे जणू आदिदेव किंवा ब्रह्मा म्हणता येईल. ज्या वृद्ध शरीराचा माध्यम म्हणून आधार घेऊन दिव्य ज्ञान प्रकट केले जाते, तो सृष्टीचा आदिपिता ब्रह्मा. शास्त्रामध्ये देखील ब्रह्माला वृद्धरूपात पांढरी दाढी व पांढऱ्या पोषाखात दाखवले गेले आहे. या साधारण मानवाच्याद्वारे ईश्वर कलियुगाच्या शेवटी येऊन श्रेष्ठ सत्ययुगी सृष्टीची स्थापना करतात तो काळ म्हणजे 'कल्याणकारी पुरुषोत्तम संगमयुगाचा काळ.' परमात्मा निराकार असल्यामुळे ब्रह्माच्या साधारण साकार माध्यमाच्या आधारे मानवाला जे ज्ञानधन, दिव्यगुण अनेक आत्मशक्तिंनी संपन्न करतात. ज्या ज्ञान व गुणांच्या धारणाने मानव पुढच्या अनेक जन्मांसाठी चरित्रवान, गुणवान, संपत्तीवान बनतो आणि सुवर्णकाळात देवता म्हणून श्रेष्ठ पद प्राप्त करतो. या अक्षय भेटवस्तू परमात्म्याकडून मानव आत्म्यांना प्राप्त होतात.

**गिरिजाघर आणि घराघरात केलेली रोषणाई** – या दिवशी प्रत्येक चर्चमध्ये किंवा घराघरांमध्येदेखील दिवे मेणबत्त्या प्रज्वलित केल्या जातात. अनेक प्रकारचे दिवे लावू रोषणाई केली जाते. ही अल्पकालीन रोषणाई खूप काही सांगून जाते. ज्योतिस्वरूप, प्रकाशपुंज परमात्मा जो आपल्या ज्ञानाच्या प्रकाशाने अनेक आत्म्यांना उजळवून टाकतो. परमात्मा शिवमहाज्योत अनेक आत्मारूपी दिव्यांना ज्ञानप्रकाशाने प्रज्वलित करतात आणि अज्ञानरूपी अंधकार दूर करतात म्हणून म्हणतात, तमसो मा ज्योतिर्गमय' अशा ज्ञानरूपी दिव्य प्रकाशाने मानवज्योत पुन्हा प्रज्वलित होते आणि कलियुगी अंधकार नष्ट होतो व सत्ययुगी पहाट उजाडते. त्याचे प्रतीक म्हणून ही घराघरात केलेली ही रोषणाई.

मिष्टान्न खाणे, इतरांना खाऊ घालणे, शुभेच्छा कार्ड वाटणे, मिष्टान्नाचा गोडवा हा काही काळापुरता तोंड गोड करेल; परंतु ईश्वराच्या द्वारे प्राप्त माधुर्यरूपी दैवी गुण आपले जीवन मधुर करते. अनेक संबंधांमध्ये माधुर्य आणते. परमात्म्याकडून प्राप्त अनके दिव्य वरदान, जीवनात उतरवून आपण अनेक मानव आत्म्यांसाठी विशाल हृदयातून मोठ्या मनाने सद्भावना प्रकट करतो. अशा या सद्भावना श्रेष्ठ कामना मानवाला चिरकाल आनंद प्रदान करतात. आपल्याद्वारे परमात्मा अनेक आत्म्यांचा उद्धार करतो त्याचे प्रतीक म्हणजे मिष्टान्न खाणे आणि एकमेकांना शुभेच्छा देणे.

तर मग चला ईश्वरी ज्ञानप्रकाशाने स्वत:ला प्रज्वलित करून अनेक जन्मांसाठी ईश्वरी सुखशांति संपन्नतेचा वारसा घेऊन खरा नाताळ सण साजरा करू या !

***

## वर्गणी विषयक सूचना

आपण सर्व जण जाणत आहात, महागाई वाढत आहे. याचा परिणाम आपल्या अंकाच्या किमतीवरही झाला आहे. मासिकाचे १७ वे वर्ष एप्रिल २०२३ मध्ये सुरू होत आहे. वार्षिक वर्गणी ८५ रूपये करण्यात येत आहे. तसेच आजीव सभासद वर्गणी १५०० रूपये करण्यात आली आहे. सर्व सेवाकेंद्राच्या टीचर बहिणींनी तसेच सभासदांनी याची नोंद घ्यावी आणि वाढता प्रतिसाद द्यावा ही विनंती. आपणास ज्ञात आहेच, सभासद होण्याकरिता आर्थिक वर्ष सुरू होण्याची वाट पाहायची आवश्यकता नाही. सभासदत्व कुठल्याही महिन्यात घेऊ शकता.



# दृष्टी पलीकडची सृष्टी

## (भाग – ३)

ब्र.कु. प्रफुल्ल, मीरा सोसायटी, पुणे

माझ्या ईश्वरी जीवनात मी बाबांबरोबरचा मित्रत्वाचा संबंध अधिक आवडत असल्याने मी त्यांना नेहमी बरोबर ठेवायचो. परीक्षेचे वेळी बाबांनाच म्हणे आता तूच लिही. मी म्हणायचो बाबा तुम्ही अशरीरी आहात, नाही तर परीक्षेला मी गेलोच नसतो, तुम्हालाच पाठवले असते, पण काही हरकत नाही. माझ्या शरीराचा आधार घेऊन लिहा आणि ह्या सारखे खूप काही बाबांशी बोलायचो आणि निश्चिंत व्हायचो. परीक्षेच्या अगदी शेवटच्या मिनिटापर्यंत मुलं पुस्तकं चाळायची. मग मी त्यांना शुभभावना देऊन बाबांना सांगायचो, की ही सर्व तुझीच मुलं आहेत. ह्यांनाही छान पेपर्स जाऊ दे. उत्तीर्ण कर. प्रश्नपत्रिका समोर येताच बाबांच्या मदतीमुळे मी भराभर उत्तरे पूर्ण करायचो. सगळ्यांना कळायचेच नाही की हा भरभर पुरवणी घेऊन काय लिहितोय. सांगायची गोष्ट अशी की बाबांना तुम्ही सोबती बनवले तर बाबांची मदत अनुभव करालच.

घरच्यांना निकालाचे वेळी धाकधूक होती की हा पास होईल की नाही, पण मी मात्र एकदम निश्चिंत होतो. बाबा बरोबर आहेत. काय काळजी ! आणि त्यातच निकाल हाती आला आणि काय कमाल बाबांची. मी तर सीएच्या भारत यादीत चमकलो. किती आनंद झाला म्हणून सांगू ! लगेच बाबांचे आभार मानले. ही तर तुमचीच कमाल हा बाबा ! माझे शिक्षकही अवाक् झाले, की मी जास्त वाचू शकायचो नाही, ऐकून अभ्यास करून मेरिटमध्ये कसा आलो? भारतात पहिले ५० क्र. असतात. त्यात मी ३१वा होतो. यामुळेही बाबांनी माझ्याद्वारे खूप सेवा करून घेतली. जिथे जिथे मला सत्कारासाठी बोलवायचे तिथे तिथे मी सांगायचो की राजयोग कशाप्रकारे कमाल करतो ! बुद्धी कशी एकाग्र व्हायला परमात्म्याची मदत मिळते पावलो पावली. 'सी.ए.'च नाही तर बी.कॉम, एम.कॉमलाही मी बोर्डात आलो म्हणजे संपूर्ण पुण्यात मी ४ था आलो. त्याचबरोबर ट्रिनिटी म्युझिक कॉलेज लंडनमधून ही पुण्यात गुणवत्ता यादीत आलो होतो. (ह्याच्या ८ पायऱ्या असतात.) त्याकाळी पुण्यात दोनच जण होते ८ पायऱ्यांपर्यंत पोहोचणारे, मी त्यातला एक होतो.

त्याचबरोबर मी एमएस्सी, एमबीए, सीसी IFRS असेही कोर्सेस केले. मला शिकायला खूप आवडते. माझ्या मनाला लहानपणी फारच लागले होते की, हा काही फारसं शिकू शकणार नाही. म्हणूनच त्या काळात होतील तेवढे अभ्यासक्रम मी केले. त्याचबरोबर मी काऊंसिलिंग, हिप्नो थेरपी केले.

अभ्यासाची आवड तर होतीच पण बाबांनी मला अशी बुद्धी दिली की, एकदा वाचले की लगेच लक्षात रहायचे. परीक्षेत बाबांची मदत घ्यायचो. बाबांची अशाप्रकारे मदत मिळत असल्याने माझ्यात एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला. शक्ती आली. त्यानंतर खूप मोठ्या प्रमाणावर वर्ग सेवा सुरू झाली. उदा. स्पार्क विंग, ह्यातून मोठ्यांचा विश्वास आपण कसा जिंकू शकतो हे कळले.

त्यावेळी पुण्यात महाराष्ट्राचे विभागीय समन्वयक होते अनुरूप मराठे (हे खूप जुने भाऊ आहेत) आता ते हयात नसले, तरी त्यात त्यावेळी स्पार्क समितीचे सदस्य होते. ते खूप सेवा करायचे. त्यांना माहिती होतं की मला सेवेची आवड आहे. ते मला टायपिंगची सेवा द्यायचे. पण मी ते टायपिंग नुसतंच न करता त्यात वैविध्य आणण्यासाठी काही न काही चित्र वगैरे टाकायचो. ते बघून भाईजी फारच खूश व्हायचे. मग त्यांनी मला पॉवर पॉईन्ट बनवायला सांगितले. तसं पाहिलं तर काहीही यायचं नाही मला पण (हाँ जी) 'होयबा' च्या पक्क्या पाठाने सारे काही निभावून जायचे.

लहान लहान सेवा मी भराभर करायचो. पत्रक बनवायचे, पुस्तक प्रकाशित करणे, टायपिंग, संपादीत करणे

यामध्ये प्रवीण झालो. पुस्तक छपाई हे ही केले. 'विघ्नो पर विजय' हे स्पार्कचं पुस्तक मीच संपादीत केलंय.

नवजीवन दायिनी मुरली, स्मार्ट योगा पॅकेज रुहानी जन्मपत्री ह्या ही सेवा केल्या. ह्या सर्वांत अनुरुप मराठे भाई मार्गदर्शन करीत. एक दोनदा अनुरुप भाई सादरीकरण (presentation) द्यायला जाऊ शकले नाही. तर त्यांनी खूप मोठ्या विश्वासाने ते मला करायला सांगितले. अशाने माझा आत्मविश्वास खूप वाढला. बोलण्याची कला वाढली. त्यासाठी मी भाईंकडून अभिप्रायही घ्यायचो अशा प्रकारे ज्ञानाची गोडी लागते. ते खोलवर कळू लागले.

'यूथ फॉर ग्लोबल पीस' ही ७ महिन्यांची सेवा त्यातही प्रकल्प, नियोजन, रचनात्मक करत गेलो. रॅलिजची ही सेवा केली. मोठ्यांनी (भाई-दीदी वगैरे) सांगितलेले प्रत्येक बदल मी आवर्जून करायचो अगदी त्याक्षणी मला आवडले नसले तरी, कारण ह्यात काही कल्याण असेल नक्की असं वाटायचं.

रमेश भाई शहांनी ३ वर्षांपूर्वी शरीर सोडलं. त्यांच्याबरोबर केलेल्या या सेवेचाही छान अनुभव आहे. कुठल्याही सेवेत असताना ते एका ओळीत अभिप्राय द्यायचे. 'हे चालणारच नाही. हे चुकीचं आहे ह्याची परवानगी नाही.' मला वाटायचं हे असं का रूक्षपणे बोलतात ! प्रेमानीही सांगू शकतात न ! पण हळूहळू त्यामागील भाव मला कळायला लागला. त्यांनीही मला पुढे जाण्यास खूप मदत केली. डिझायनिंग मध्येही बाबांनी मला खूप मदत केली. कोरल ड्रॉ, फोटोशॉप ह्यात बघायचंच काम जास्त असायचं. तरी ह्याच प्रकारची सेवा मला मिळत गेली. मी अजूनही खूप जवळून बघतो. राष्ट्रीय प्रकल्प रचनाची सेवा असेल, तेव्हा मी रमेश भाईंना ते तपासण्यासाठी पाठवायचो. ते खूप बारीकाईने बघून अनेक मुद्दे सांगून माझ्या चुका दाखवून द्यायचे. अशाप्रकारे त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळालं. सर्वांकडून चालना घेऊन पुढे जात राहिलो. राजयोगाचा प्रयोग मी माझ्या ऑफीसमध्येही केला.

सध्या मी बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत आहे. जोखीम खात्याचा कारभार बघतो. आमची संघटनाही खूप छान आहे. इथेही माझा दांडगा अनुभव आहे. ही नोकरी मिळवतानाचा इंटरव्ह्यूलाही बाबांनी खूप मदत केली. मला वाटायचे मला एवढे कमी दिसते, कोण मला ऑफीसमध्ये घेईल? पण बाबांची एवढी जादू झाली, की मी इंटरव्ह्यूमध्ये काय बोललो, प्रश्न काय होते, कशी उत्तरे दिली काहीच कळले नाही.

ऑफीसमधली आव्हाने सगळं बाबांच्या मदतीने पार पडत गेलं. 'सी.ए.'च्या नोकरी मध्ये देय-तारीख असल्याने कधी ९-१०, रात्रीचे बाराही, तर कधी २ पहाटे ४-५ला ही मी घरी आलो आहे. पण बाबा आपल्या मुलांना अशाही परिस्थितीत एकदम निश्चिंत ठेवतात हा अनुभव मी घेतलाय - पहा ना सकाळी ९-१० चीच तरतरीत अवस्था रात्री १०लाही असायची. बाकी सगळे जरी ह्या कामाच्या ओझ्याला कंटाळत असले, तरी मी मात्र आनंदी होतो.

आपण बाबांची मुलं दर तासाला बाबांची आठवण करतो. ट्रॅफिक कंट्रोल करणे, मुरली ऐकणे, विचार मंथन करणे ह्यामुळे अवस्था एकदम निश्चिंत असायची. सर्वजण म्हणायचे देखील की तुम्ही तर आत्ताच ऑफीसला आला आहात इतके प्रसन्न दिसता. हे तुम्हाला कसं जमतं हो? आम्ही तर कामाच्या ओझ्याने पार थकतो. मी लगेच त्यांना बाबांचा परिचय द्यायचो, सांगायचो. परमात्मा आपल्या मुलांना कशा प्रकारे मदत करतो. कशाप्रकारे शक्ती भरतो. - अशी सेवा होत असे ऑफीसमध्ये.

माया पण आपली परीक्षा घेत असते. बऱ्याच वेळा सहकाऱ्यांसोबत बाचाबाची व्हायची मग ते माझी तक्रार करत साहेबांकडे. मग मी साहेबांना सद्भावनायुक्त प्रकंपनं द्यायचो आणि त्याचे वागणे बोलणेच बदलून जायचे.

एकदा तर साहेबांनी आमच्या न्युयॉर्कच्या ऑफीसमध्ये माझी (वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे) तक्रार केली. त्याच असं झालं. की मी माझं ६-७ तासाचं काम १-२ तासात आटपून वेबसाईटला जाऊन बाबांचा संदेश द्यायचो. फेसबुकवर वगैरे बाकीचे लोक टाईमपास करत तेच काम दिवसभर करायचे.

माझे साहेब जेव्हा हे बघायचे तेव्हा त्याला वाटायचं की हा तर टाईमपास करतोय. ब्र.कु. संस्थेचं काम करतोय म्हणून त्यांनी माझ्याविषयी वरीष्ठ अधिकाऱ्यांना तक्रार केली. जेव्हा त्यांनी कक्षामधे बोलावलं मी म्हटलं की माझं काम मी न चुकता वेळेवर करतो. तू वेळ वाया घालवतोस, तुझं लक्ष नसते असं साहेबांनी कक्षामधे येऊन सांगितलं.

मी म्हटलं माझ्या फावल्या वेळात मी ही सेवा करतोय - तरी साहेब नाराज होते. अनेकदा अशाही काही गोष्टी घडायच्या.

मग मी योगाचे प्रयोग करायला सुरुवात केली. म्हटलं बाबांनी हे आव्हान ठेवलंय आपल्यासमोर. मी दहा मिनिटांची सुट्टी घेऊन बागेत जायचो. बाबांची किरणं ह्या लोकांना पाठवायचो. एका आठवड्यातच साहेबांचा माझ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला सुरुवात झाली. तो हळूहळू खूप बदलत गेला.

जेव्हा माझ्या लग्नाची गोष्ट निघाली, तेव्हा सगळ्यांनीच ह्या गोष्टीला दुजोरा दिला, की तुला तर आत्ताही दिसत नाही. म्हातारपणी काय करशील? पण मी मात्र कुमार जीवन आनंदाने व्यतीत करत होतो. पवित्रता मला खूप आवडते. मी सर्व काही बाबांवर सोपवून निश्चिंत होतो. काही नियम मी माझ्या जीवनात तत्परतेने पाळतो. १) बाबांची मुरली कधी चुकवत नाही. सेवाकेंद्रावर नियमित जातो. २) तसेच बाबांना सांगतो, की मला कितीही सेवा दे; पण अहंकार मात्र येऊ देऊ नकोस. बाबांनी मला अनेक सेवांमध्ये संधी दिलीय, अशा वेळी कधीतरी सूक्ष्म अहंकार येऊ शकतो. पण बाबांना मी सांगतो मी नेहमीच निरअहंकारी राहीन. ३) बाबांना मी नेहमीच माझ्या बरोबर ठेवतो. प्रत्येक काम करताना बाबा म्हणतात न... ४) तसेच मी (हाँ जी) होयबा चा हाँजीचा पाठ ठेवलाय. मी नाही म्हणत नाही. ५) नेहमी शिकायची तयारी ठेवतो.

पुढे जायची इच्छा ठेवतो. शिकायला काही वय लागत नाही हो ! असे ४-५ नियम मी पाळतोच पाळतो. हाच माझ्या जीवनाचा साररूपातील अनुभव आहे. मी मजेत ब्र.कु. जीवन जगत आहे.

***

---

(पृष्ठ क्र.३ वरुन)

शिव परमात्म्याच्या अवतरणामुळे बाबांचे जीवन पालटले हे आपण जाणतो. या सृष्टीवर पुन्हा देव देवतांचे आगमन व्हावे याकरिता ब्रह्माबाबा कटिबद्ध झाले. मनात वैराग्याचा उदय झाल्यावर जवाहिऱ्याचा व्यापार तर थांबवला, परंतु ज्ञानरूपी रत्नांचा व्यापार मात्र चढत्या आलेखाने वर जात राहिला. सिंध हैदराबादेत स्वतःच्या घरात एका खोलीत येणारे इच्छुक वा साधक यांची संख्या वाढू लागली. म्हणून मधली एक भिंत काढून खोली मोठी करण्यात आली. मग 'वाढता वाढता वाढे, भेदिले शून्य मंडळा' या उक्तीप्रमाणे संस्थेच्या कार्याने हनुमंताची झेप घेतली. आज एकशेचाळीस देशात चार हजाराहून अधिक शाखांद्वारे राजयोगाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य अविरत चालू आहे. ज्ञानसागर शिवपित्याचे ज्ञान आपल्या अंगी बाणवून इतरांपर्यंत पोहोचविणाऱ्या असंख्य भगिनी या कार्यात सामील झाल्या. त्यांच्या मुखकमलातून निघणारे ज्ञान पाहता त्यांना दिलेली ज्ञानगंगेची उपाधीही सार्थ ठरते. एवढ्या महान कार्याची पायाभरणी करणाऱ्या बाबांचे जीवन, भगीरथाचे जीवनच म्हणावेसे वाटते. आज इथेच थांबू या.

***

---

(पृष्ठ क्र.४ वरुन)

स्थापना तुला करायची आहे असा आदेश ब्रह्माबाबांनी शिरोधार्य मानून आपले जीवन घडवले. शिवपित्याचे ज्ञान आपल्या कर्मातून प्रकट केले. जे कार्य केले त्यास कर्मयज्ञ म्हणता येईल. यज्ञः कर्मसमुद्भवः अर्थात् कर्मापासून यज्ञाची उत्पत्ती होते (गीता अ. ३, श्लोक १४) असे म्हटले जाते ते तंतोतंत खरे आहे.

नवी सृष्टी किंवा जीवनात परिवर्तन आपोआपच कसे घडून येईल! काही जादूची कांडी फिरवल्यासारखे बदल तर घडणार नाहीत. कर्म बदलण्यासाठी ज्ञानाची आणि त्यासोबत शक्तीची आवश्यकता असते. केवळ ज्ञान मिळून फायदा होत नाही. 'कळतंय पण वळत नाही' असे आपण म्हणतो, कारण मन शक्तिशाली नाही म्हणून पाहिजे तसे वळत नाही. या सगळ्याकरिता शिवपित्याने दिलेले ज्ञान, कर्मांद्वारे ब्रह्माबाबांनी प्रत्यक्ष करून दाखविले.

स्वतःला आत्मा समजून निराकाराची आठवण केल्यानेच मन-बुद्धीवर अंकुश ठेवणे साध्य होऊ लागते. यालाच राजयोग म्हटले आहे. राजयोगाच्या साधनेतूनच संस्कार परिवर्तन आणि कर्म परिवर्तन साधता येईल. अशा प्रकारे शिवपित्याने दिलेल्या ज्ञानमार्गावर चालून नवयुग दृष्टीपथात येईल. ईश्वराच्या कार्यात तोच मोठा हातभार ठरेल. २०२३ या आगामी नववर्षाच्या तसेच येऊ पाहणाऱ्या नवयुगाच्या निमित्ताने अमृतकुंभच्या सर्व वाचकांना भरभरून शुभेच्छा. सर्वांचे आयुष्य सुखी समाधानी जावो तसेच आध्यात्मिक भरभराटीचे जावो हीच मनोकामना.

***



# प्रकाशवाटा

## (भाग – २)

## मधुबन पावन भूमीवर पहिले पाऊल

**ब्र.कु. सुभाष, ज्ञान सरोवर, आबू पर्वत**

१९७६ मध्ये मधुबनच्या पवित्र धरतीवर येऊन माझे मोठे भाऊ अर्जुन दादा यांनी हा संकल्प केला की महू (इंदौर) येथून दोन महिन्यांची (भारतीय सैन्य सेवा) सेनेची सुट्टी मिळताच गावी जाऊन ब्रह्माकुमारीच्या गीता पाठशाळा निर्माण करीन. त्यात त्यांना यशही मिळाले. सुट्टी संपल्यावर ते जेव्हा परतत होते, तेव्हा त्यांनी मला दोन पुस्तके दिली. साप्ताहिक पाठ्यक्रम आणि दिव्यगुणांचा पुष्पगुच्छ आणि म्हणाले, 'रोज ह्याची चार पाने वाचत जा.'

आम्ही लोक रात्री बरोबर आठ वाजता एक घंटा वाजवत असू. त्यानंतर सुमारे ५०-६० भाऊ-बहिणी माता ते ऐकण्यासाठी तिथे येत. आमच्या जिल्ह्यात ब्रह्माकुमारीच्या गीता पाठशाळेस प्रारंभ झाला. जेव्हा मोठे भाऊ दुसऱ्या वर्षी सुट्टीत आले, तेव्हा ते त्यांच्या सोबत काही ज्ञान मुरलीच्या प्रती घेऊन आले. त्यानंतर साधारण २ वर्षानंतर ते काही भावा-बहिणींना बरोबर घेऊन मधुबनला गेले. जे येत, ते मधुबनचा महिमा गात, ते ऐकून माझंही मन एकदम अधीर व्हायचं. अशातच वडिलांचे देहावसान झाले आणि मनात वैराग्य यायला लागले. मी १९८३ ला दहावी बोर्डाची परीक्षा दिली आणि त्यानंतर साताऱ्याला नलिनी बहिणीस भेटून मधुबनला जायचा हट्टच केला. "माझ्याजवळ पैसे नाहीत; पण माझे लौकिक भाऊ तुलसीभाई मधुबनमध्ये सेवेला आहेत. ते व्यवस्था करतील" असे म्हणालो. नलिनी बहीण खूप प्रेमाने मला मधुबन पावन भूमीवर घेऊन गेल्या. त्या दिवशी महाराष्ट्राचे नवीन वर्ष गुढीपाडव्याचा दिवस होता. दुसऱ्याच दिवशी दादी आणि दीदींना भेटायचे भाग्य लाभले. दीदी भेटवस्तूचे (सौगात बाबांची) महत्त्व खूपच प्रेमाने समजावत होत्या. शिवबाबांची फ्रेम, नॅपकीन आणि चांदीची अंगठी तीन भेटवस्तूंपैकी कोणतीही एक घ्यायची होती. लहान असल्याने मला काही ते कळले नाही आणि मी तिन्ही भेटवस्तू वेगवेगळ्या रांगेत जाऊन घेतल्या. जेव्हा मी दादींकडून भेटवस्तू घेत होतो, तेव्हा शिवबाबांची फ्रेम दाखवून दादींनी म्हटले, "शिवबाबांची आठवण करशील ना?" ही दादींशी माझी समोरासमोरची दुसरी भेट होती. दीदी दादींच्या प्रेमामुळे आतल्या आत समर्पित होण्याचे बीजच पडलं जणू!

***

## श्रद्धांजली



डॉ. मंजुलाबेन

ब्र.कु. गोदावरी दीदीजी मुलुंड सब-झोन संचालिका, यांची लौकिक बहीण डॉ. मंजुलाबेन यांनी १५ नोव्हेंबर २०२२ रोजी अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याचे निमित्त घडले आणि त्यांनी आपला देह ठेवला. गेली काही वर्षे मंजुलाबेन मुलुंड (पश्चिम) सेवाकेंद्रावर राहत होत्या. शिव परमात्मा, ईश्वरी ज्ञानयज्ञ आणि अलौकिक परिवारावर त्यांचे अलोट प्रेम होते. बापदादा व सर्व दादींचा स्नेह त्यांना मिळाला. ईश्वरी स्मृतीत त्यांनी आपला देह त्यागला. अमृतकुंभतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली.



# परमत्यागाच्या महामेरु राजयोगिनी संतरी दादीजी

ब्र.कु. हेमंत, शांतिवन

दिल्लीच्या इंडिया गेटवर स्वातंत्र्य-संग्रामात महान त्यागाचा परिचय देणाऱ्या परमवीरांचा नामोल्लेख आहे, अशा बलिदानी वीरांसमान, ज्यांनी रुद्र यज्ञात सर्वस्व स्वाहा करून त्यागाचे विक्रम निर्माण केले- त्या अननोन बट वेरी वेलनोन (खूप गुप्त अन् खूप प्रसिध्द / महान देखील ) महारथींच्या मालिकेतलं एक अविस्मरणीय नाव आहे राजयोगिनी दादी संतरीजी! सरळ स्वभावाच्या, मनमिळाऊ संतरी दादीजी तर अजोड त्यागाच्या अनमोल उदाहरण होत्या. त्यांनी पद-प्रतिष्ठा-प्रसिध्दीच्या सोनेरी साखळ्या तोडल्या व शिवपित्यावर संपूर्ण अर्पण झाल्या. श्रेष्ठ त्यागाद्वारे महान बनल्या. संतरी दादींनी स्वतःस सदैव गुप्त ठेवून सर्वांना त्यागमूर्त बनण्याची प्रेरणा दिली. दादीजींच्या निःस्वार्थ, न भूतो न भविष्यति त्यागाची कथा ऐकून कुणीही श्रध्देने सहज नतमस्तक होईल! तर पाहू या दादींच्या परमश्रेष्ठ त्यागाची प्रेरणादायक गाथा....

ही दिव्य-अलौकिक घटना आहे सन् १९६९ ची... ब्रह्माबाबांची तपस्या परकाष्ठेला पोहोचली होती. १८ जानेवारीच्या संध्याकालिन सभेत बाबा संबोधत होते, प्रिय वत्सांनो निराकारी, निरहंकारी, निर्विकारी भव ! ब्रह्मावत्सांच्या दिव्यबुध्दिरूपी कुंभात अध्यात्माचे (सार) अमृत ओतत अखेर बाबा वदले, प्रिय वत्सांनो, अलविदा पण बाबा शेवटची सलामी देत होते हे कुणालाही कळलं नाही. बाबा खोलीत येऊन खाटेवर बसले व प्रकाशमणी दादींना दृष्टी देत कर्मभोगावर कर्मयोगाने विजय प्राप्त केला. आत्मारूपी पक्षी देहाच्या पिंजऱ्यातून मुक्त झाला. दादींनी सर्वांना टेलिफोनद्वारे ब्रह्माबाबांच्या अव्यक्त होण्याचा संदेश दिला. सर्व ब्रह्मावत्स पिताश्रींच्या अंतिम मिलनासाठी येत होते. १९ जानेवारीला सायंकाळी सर्व हिस्ट्रीहॉल (छोट्या हॉल) मधे एकत्र झाले. अचानक प्रभु प्रेरणेने संतरी दादी ध्यानमग्न झाल्या, व योग करायला आसनावर जाऊन बसल्या. तेवढ्यात सुखद आश्चर्य घडलं! संतरी दादींच्या देहात शिवबाबांनी प्रवेश केला. प्रथम अव्यक्त (ज्ञान) मुरली उच्चारली. शिवबाबा वदले, वत्स(ब्रह्माबाबा) सूक्ष्म सृष्टीत विश्रांती घेत आहे, अंतिम संस्कारानंतर बापदादा दोघे पुन्हा येतील. २० जानेवारीला सकाळी संतरी दादी भ्राता रमेशजींना भेटून म्हणाल्या, बाबा उद्या गुलजार दादींच्या माध्यमाद्वारे यावेत, कारण मी सुरुवाती पासून मुख्य ध्यान संदेशवाहक आहे, यज्ञाच्या सर्व गोष्टी जाणते. जर बाबा माझ्या देहात आले तर कुणाचाही विश्वास बसणार नाही, सर्व म्हणतील मी स्वतः बोलतेय, शिवबाबा वगैरे काही नाही. तेव्हा रमेशभाई म्हणाले, दादीजी, तुम्हीच बाबांना विचारा. हे ऐकून दादी ध्यानात गेल्यावर बाबा म्हणाले, मला तर रथ अर्थात् माध्यम हवंय, तुम्ही वत्सच निश्चित करा. संतरी दादी व रमेश भाई मनमोहिनी दीदी व प्रकाशमणी दादींकडे गेले, पण त्या दोन्ही व्यग्र असल्याने म्हणाल्या, गुलजार दादींनाच विचारा. गुलजार दादींनी उत्तर दिलं, जे बाबांना व सर्वांना मान्य ते मलाही मान्य आहे. शेवटी संतरी दादी म्हणाल्या, यज्ञाची सुरक्षा व भविष्यातील कार्यव्यवहाराच्या दृष्टीने बापदादा गुलजार दादींच्या देहात यायला हवेत. २१ जानेवारीला ब्रह्माबाबांच्या पार्थिव देहावर अग्नि संस्कार झाला व गुलजार दादी नैवेद्य दाखवायला उठल्यावर दीदी मनमोहिनी म्हणाल्या, ओ गुलजार कुठे जातेय? नैवेद्य संतरी दादी दाखवतील. तेव्हा संतरी दादींनी दीदींना आपला निर्णय सांगितला. अशा प्रकारे २१ जानेवारीला बापदादा गुलजार दादींच्या शरीरामधे आले. त्यानंतरही प्रकाशमणी दादी, बृजेंद्रा दादी, निर्मलशांता दादींनी संतरी दादींना खूप समजवलं. बापदादांचा रथ बनण्याचा आग्रह केला. पण यज्ञाचे हित पाहून संतरी दादी

आपल्या निर्णयावर दृढ राहिल्या. भगवंताचा देहाधार बनण्याचे भाग्य एका क्षणात त्यागले. मुख्य ध्यान संदेशवाहकाची भूमिका गुलजार दादींच्या शिरी ठेऊन हिमालयापेक्षाही ऊंच त्यागाचा इतिहास रचला. खरे तर संतरी दादींच्या ह्या परमत्यागामुळेच लाखों ब्रह्मावत्स गुलजार दादीद्वारे प्रभु मिलनाचे अहो सौभाग्य प्राप्त करू शकले.

सिंध हैद्राबाद येथे दादीजींचा दैहिक जन्म झाला व मातपित्याने नाव दिलं, सावित्री!. एकदा ओमनिवासमधे दादींना श्रीकृष्णाचा साक्षात्कार झाला, त्यावेळी त्यांच्या नेत्रातून प्रेमाश्रु वाहू लागले, ते पाहून ब्रह्माबाबा म्हणाले, ''हे तर जणु लाल-लाल संत्र्याचा रस निघत आहे.'' तेव्हापासनू ब्रह्माबाबा प्रेमाने दादींना संतरी म्हणत. त्याचबरोबर दादींना शिवपित्याने दिलेलं अव्यक्त नाव होतं, निर्मलइंद्रा! बालपणापासूनच संस्कार सतोगुणी असल्याने दादी, संगदोषापासून अलिप्त राहत व फक्त अभ्यासात लक्ष्य देत. मितभाषी दादींचा विवाह पंधराव्या वर्षी दादा लेखराज यांचे पुतणे भैरु दादा (विश्वकिशोर भाऊ) यांच्याशी झाला, ह्या नात्याने दादा लेखराज(ब्रह्माबाबा) दादींचे सासरे होते. विश्वकिशोर भाऊंचा ब्रह्माबाबांसोबत कोलकाता येथे व्यापार होता. त्यामुळे लग्नानंतर दादी कोलकात्यास गेल्या. राहत्या घरी तळमजल्यावर जवाहिऱ्याचे दुकान होते व पहिल्या मजल्यावर दादी बाबांच्या सान्निध्यात राहत. पण आजारपणात भाऊंनी त्यांच्यासोबत बसावे, काही विचारपूस करावी अशी दादींची कधीच इच्छा नसे. जसं विश्वकिशोर भाऊ बाबांना पुत्रांसमान, तशाच दादी मुलीसमान होत्या. असं दोघाचं पवित्र जीवन व दादींचं पावन बालपण होतं. जसं माहेर सम्पन्न तसं सासरही धनाढ्य होतं. सासरी आठ-आठ नोकर होते. पाणीही हातात मिळे. खोलीतल्या बाबांच्या फोटोकडे पाहून दादींना फलप्राप्तिचा अनुभव होई व बाबांच्या सेवेचा विचार येई. जसं भाऊ बाबांची प्रत्येक आज्ञा पाळत. तसं दादी बाबांना सन्मान देत. बाबा दुकानात जातेवेळी दादी वेलची देत. यशोदा मैय्या सकाळी ३ वाजता माळ घेऊन जप करत, तेव्हा दादी बाबांच्या शेजारी जाऊन ब्रह्मानंद ग्रंथातील गीत गात. बाबा बागेत जाऊन आपला आवडता हॉकी खेळ खेळत, त्यावेळी दादी बाबांच्या मागे-मागे जात. झाडाखाली बसून गीता वाचत व नंतर बाबांसोबत हॉकी खेळत.

बाबा बनारसला गेले, तिथे झालेल्या साक्षात्काराचं वर्णन पत्रांमधे करून दादींना अनुभव पाठवत. दादी चार वाजता ध्यानामग्न अवस्थेचा अनुभव करत, जणु त्या बाबांशी सवांद करत आहेत! इकडे यशोदा मैय्या भक्ती करत, तसंच दादीही तीन-तीन तास पूजा करत. सुखमणी, जपसाहेब, भागवत, गीता, पाण्डवगीता वाचत. दादी संस्कृत मध्ये पाचवी व इंग्रजीत दुसरीपर्यंत शिकल्या होत्या. त्यासोबत दादींना सिंधी व गुरुमुखी येई. बाबांनी बनारसहून परत आल्यावर हिऱ्याचा व्यापार आवरता घेतला. एका रात्री भागीदारासोबत चंगोपट खेळताना बाबांना विचार आला, छोडो तो छूटे व कवड्या फेकत बाबा बोलत गेले, हे सोडू? हे सोडू? भागीदारही मोठ-मोठ्या वस्तू (सोन्या-चांदींची भांडी) मागत गेला व बाबा होकार देत गेले. अशाप्रकारे पहाट होताच बाबांनी कोर्टाद्वारे कागदपत्रं तयार केली व ज्ञानरत्नांच्या व्यापार सुरू केला. मग सिंध हैद्राबाद जाऊन जसं ब्रह्माबाबा शिवबाबांवर समर्पित झाले, तसच विश्वकिशोर भाऊही समर्पित झाले. एके दिवशी बाबा दादींना म्हणाले, मुली जसा विश्वकिशोर भाऊ समर्पित, तशी तूही समर्पित हो. आई-वडिलांकडे ठेवलेला तुझा हिस्सा तूही यज्ञात स्वाहा कर. दादींच्या माहेरी प्रत्येकाचे एक कपाट होते, त्यात दादींच्या नावे ठेवलेल्या पेटीत सणावाराला हातखर्चाचे (पैसे) ठेवले जाई. दादींच्या कपाटात चांदीची भांडी, ६०-७० मोहरा व जमा झालेले पैसे होते. दादींच्या आई दादींना भेटायला कराचीला येत. एकदा दादींनी आईस स्वतःच्या जमापुंजी विषयी विचारलं तेव्हा आई दादींची ठेव घेऊन आल्या. आपला वाटा यज्ञात अर्पण करून दादीही संपूर्णपणे समर्पित झाल्या.

एकदा कोलकात्यात असताना दादींना अपेंडिक्समुळे वेदना झाल्या. डॉक्टरने नाडी चेक केल्यावर दादींच्या तोंडातून आह! निघाले, तेव्हा बाबा म्हणाले, मुली थोडंही सहन करायची शक्ती नाही का? कुणी रागावलं तर रडशील का? अशा प्रकारे बाबांनी दुःखालाही आनंदात बदलायची कला शिकवली. कराचीत असताना दादींना दमा झाला, पण बाबांनी डोक्यावरून हात फिरवताच दमा बरा झाला. असंच एकदा दादींचे पोट दुःखायला लागले. डॉक्टरने हॉस्पिटलमधे जायचा सल्ला दिला. पण दादींना निश्चय होता मी अविनाशी इस्पितळात दाखल आहे. बाबाच मला ठीक करतील. रात्री १ ते ४ वाजेपर्यंत बाबांनी दादींच्या समोर

बसून शिवबाबांशी असा शक्तिशाली योग साधला. त्या साधनेच्या फलश्रुतीतून दादींना पोटामध्ये शस्त्रक्रिया झाल्याची जाणीव झाली. बाबांनी ४ वाजता विचारलं, मुली, झोप आली? तेव्हा दादी म्हणाल्या, नाही बाबा, पोटात काहीतरी कापाकापी होत होती. मग बाबा म्हणाले, बरं, आता बाथरुमपर्यंत चाल. थोडं चालल्यावर दादींच्या वेदना एकदम गायब होत्या. जणु सुप्रीम सर्जन शिवबाबांनी शस्त्रक्रिया केली, त्याने दादींची बाबांविषयीची भावना अधिकच दृढ झाली.

आबूत आल्यावर आर्थिक चणचणीच्या काळातही दादी आनंदी असत. बाबांनी संतरी दादींना दिल्लीच्या यमुनेच्या घाटावर मनोहर दादींकडे पाठवलं. तेव्हा पहिल्या दिवशी त्या एकट्याच उघड्या आकाशाखाली राहिल्या. दोन पैशाचे एक किलो टोमॅटो घेतले, साधुंची चूल पेटत होती, तिचाच वापर करून दादींनी मीठात पीठ मळून हातानेच पोळी सारखी गोल करून चुलीत शेकली. वाटीत टोमॅटोचा रस काढून त्याच्याशी पोळी खाल्ली. आईला दादींच्या सेवेचा समाचार मिळाला. सासरी मुलीचा राजेशाही थाट पाहिला होता अन् आता त्यागही ऐकला, त्यामुळे खुश होऊन आईने निमंत्रण दिलं. बाबा म्हणाले, मम्मा, मुलीला दोन दिवसासाठी पाठव. दादी मुंबईला गेल्या, तेथून पुण्यात आई व बहिणीकडे राहून सेवा केली. त्याचप्रमाणे बंगळुरूला जपानचे रामभाईंकडे पाच महिने राहून सेवा केली व सर्वांची मनं जिंकली. नंतर शिलाँग, गुवाहटी मधे सेवा केली. तिथे प्राप्त झालेली माधुकरी (धन) मधुबनला पाठवत राहिल्या. दादींना इंग्रजी बोलता येत नव्हतं, तरीही त्या जमैका, न्यूयार्क इत्यादी कित्येक शहरामधे एकट्याच गेल्या. फळं, दूध इत्यादी हवं असलेलं लिहून घेत व दाखवत. विमानात एकदा गुजराती बंधू भेटला, त्याने सर्व कागदपत्रे जुळवून दिली, परतीच्या प्रवासात दादी लंडनला उतरल्या. दादी जानकींशी बोलायचं होतं, पण फोन कुठे, काहीच माहीत नव्हतं, पासपोर्ट पाहणारी सेविका दादींना बाहेर घेऊन गेली, भाऊ बहिणी बाहेर उभे होते. ते दादींना सेंटरवर घेऊन गेले. श्वेत परिधानात दादी लिफ्टमधे जात, लोक आकर्षित होऊन म्हणत, दादी तर देवदूत / फरिश्ता आहेत!

भ्राता रमेश शहा दादींविषयीच्या आठवणी सांगतात, दादी मुख्य ध्यानसंदेशी होत्या. रमेशभाईंनी एकदा आग्रह केला आणि म्हणाले जसं धर्मस्थापकांनी चमत्कार केले, तसं शिवबाबांनी केलेला एखादा चमत्कार सांगा, पहिल्यांदा दादींनी टाळाटाळ केली; पण नंतर दोन प्रसंग सांगितले १) शिवबाबांकडून श्रीमत विचारायला ब्रह्माबाबा दादींना सूक्ष्म ध्यानसृष्टीत पाठवत, तेव्हा रिक्त हस्ते ध्यानाला न बसता नियमाप्रमाणे त्या नैवेद्यासाठी काही ना काही समोर ठेवून बसत. एके दिवशी बाबांनी सांगितले, तेव्हा स्वयंपाकघरातून ८-१० वेलचीचे दाणे आणि खडीसाखरेचे १०-१५ दाणे थाळीत ठेऊन, रुमालाने झाकून, दादी ध्यानास बसल्या. संदेश देण्याऐवजी स्वतः शिवबाबा दादींच्या तनात आले, हे पाहून सर्व गोळा झाले. शिवबाबांनी संदेश दिला. शिवबाबा अचानक आले होते, म्हणून खास अशी तयारी आधी केलेली नव्हती. तरीही रुमालाच्या खाली हात घालून शिवबाबांनी सर्वांना खडीसाखर व वेलची द्यायला सुरुवात केली, एका बहीण मदत करायला पुढे गेली; पण शिवबाबांनी खुणेनेच नाही म्हटलं नंतर रमेश भाई म्हणाले, म्हणजे सर्वांना फक्त एक-एक खडीसाखरेचा तुकडा मिळाला असेल. तेव्हा दादी म्हणाल्या, नव्हे, सर्वांना मुठभर मिळालं. जेव्हा दादी ध्यानावस्थेतून बाहेर आल्या तेव्हा त्यांनी आधी होती, तितकीच खडीसाखर व वेलची पाहिली. २) कराचीत असताना एके दिवशी जेवणानंतर शिवबाबांनी दादींना ध्यानाद्वारे सांगितले, तुम्हा वत्सांना ज्ञानयज्ञाकडे लक्ष दिलं पाहिजे. थोड्या वेळात पाऊस पडेल, अंगणात गहू व तांदूळ असेच पसरवून ठेवले आहेत, ते गोळा करुन स्टोअरमधे ठेवा. दादी बाबांना म्हणाल्या, बाबा पावसाचे दिवस नाहीत व आकाशात कुठे ढगही दिसत नाहीत. नंतर ध्यानावस्थेतून बाहेर आल्यावर पाऊस पडेल हे सर्वांना सांगितल्यावर हसू आले. पण हा बाबांनी दिलेला संदेश आहे हे दादींनी सांगितल्यावर सर्वांनी धान्य गोळा केलं आणि काय आश्चर्य! खरोखरच पाऊस पडला.

दादींच्या दिव्यगुणांचे वर्णन तीनसुकिया (आसाम) येथील सत्यवती दीदी असं करतात. दादी बाबांच्या आज्ञाधारक विनम्र व विश्वस्त पुत्री होत्या. बाबा व यज्ञाप्रति दादींचे हृदय आरसपानी स्वच्छ होते. त्या बाबांपासून काहीही लपवत नसत. बाबांच्या प्रत्येक आज्ञेस सद्गुरुची आज्ञा मानून पालन करीत. त्यांची बुद्धी तीक्ष्ण होती, बाबांचा इशारा समजून कुणाला काय भेटवस्तू द्यावी हे

पटकन जाणत. घेणाराही आनंदून जाई. यज्ञाच्या कोणत्याही वस्तूचे नुकसान दादींना खपत नसे. ज्या स्थानी, जितकी गरज असेल तेवढीच वस्तू वापरत. यज्ञाविषयी एवढं प्रेम होतं जणु यज्ञ त्यांच्या काळजाचा तुकडाच आहे. हंगामाचे पहिलं फळ येताच, आधी बाबांना नैवेद्य दाखवून, नंतरच खाऊ घालत व स्वतः खात. दादींचे काम खूप अचूक असे. त्यांच्या प्रत्येक कर्मातून शालीनता व सभ्यतेचे दर्शन होई. एक रुमालही इकडे-तिकडे ठेवत नसत. प्रत्येक वस्तू जागच्या जागी ठेवत. मधुबनमधे भेटवस्तू भांडारगृह सांभाळत तेव्हा वस्तू ठेवण्याच्या पद्धतीकडे पाहून कुणालाही वाटे दादी किती रॉयल व श्रेष्ठ संस्काराची खाण आहेत! वेळेची त्या खूप किंमत करत. प्रत्येक कार्य वेळेवर पूर्ण करत. मधुबनहून कोलकात्यात आल्यावर निर्मलशांता दादींच्या सहयोगी बनल्या व कन्या-मातांचे आई बनून संगोपन केले. आजारपणात कुणाची सेवा घेतली नाही. विशेषकरुन त्या भंडारगृह सांभाळत. दादींचा स्वभाव खूप शांत अन् धीर-गंभीर होता, त्या जिज्ञासूच्या समस्यांचे निराकरण सहज करत. त्यांच्यात सर्वांना यज्ञमातेचं रूप दिसे. सहयोगींना असे संगोपन देत की ते पक्के वारस बनत. दादींचा काटकसरीचा संस्कार पक्का होता. ब्रह्माभोजनाची सामग्री आधीच न मागवता माता-बंधूनी आणलेल्या वस्तू पाहूनच सामान मागवत. खरेदी करताना, वस्तू न जास्त न कमी असावी ह्याकडे लक्ष देत. कुठल्याही हंगामाची बाबांच्या आवडीची फळं मागवून मधूबनला पाठवत, पण त्यांच्या बोलण्यात-वागण्यात कधीही जाणवत नसे की त्या बाबांच्या लौकिक नातलग आहेत. विश्वकिशोर भाऊंच्या शस्त्रक्रियेच्या वेळी बाबांनी दादींना सोबत मुंबईला पाठवलं, पण त्यांच्या चेहऱ्यावर पतिच्या सेवेसाठी जाण्याचे भाव नव्हते. त्यांच्या शांतमुद्रेमुळे भासत होतं त्या फक्त बाबांची आज्ञा पाळत आहेत. दादींना स्वच्छता अतिशय प्रिय होती. नैवेद्याची भांडी व टेबल साफ केल्याशिवाय वापरत नसत. दादींच्या हावभावात शिवबाबांवर असलेली अपार श्रद्धा झळकत असे. शिवबाबांना त्या गुरुंचेही गुरू, व पित्यांचेही पिता रूपात आठवत. त्यांचा कुणात मोह नव्हता. मी दादींना सदैव साक्षी व उपराम स्थितीतच पाहिलं. शिस्तप्रिय दादीजी हिशेबात अचूक होत्या, एका पैशाचाही फरक होऊ देत नसत. दादी शिकवण देत, प्रभूस प्रसन्न करायचं असेल तर १) प्रत्येक गोष्टीत स्वच्छता बाळगा, २) हिशेबात ईमानदार रहा आणि ३) यज्ञाचं नुकसान न करता साधन संपत्तीचे जतन करा.

संतरी दादींच्या अंतिम स्थितीचं वर्णन निर्मलशांता दादी असं करतात, खरोखर संतरी दादी खूपच भाग्याशाली, पवित्र, निर्मळ आत्मा होत्या त्यामुळे शिवबाबा त्यांच्या तनात आले. ब्रह्माबाबांना संत्रे फार आवडे. संत्र्याच्या हंगामात दादी संत्र्यांचा रस काढून चांदीच्या ट्रे मधे ग्लास सजवून बाबांना व आलेल्या पाहुण्यांना देत. दादींचा संत्र्यासारखी लाल-लाल चेहरा व गोड-गोड गोष्टींनी प्रसन्न होऊन ब्रह्माबाबा प्रेमाने दादींना संतरु बेटा म्हणत. पूर्वीच्या पद्धतीनुसार दादी डोक्यावर पदर घेत, तेव्हा बाबा म्हणत, ही तर छोटी आहे, मग हिला कशाला जुन्या चाली-रीतींच्या बंधनात ठेवावी? जशी निर्मलशांता तशीच ही पण राहील. असं म्हणून बाबांनी दादींना सुनेऐवजी मुलीसारखे सांभाळले. दादींनीही मुलीचा धर्म निभावला. मधुबनमधे स्वयंपाकघर, कपड्यांचे भांडारगृह व ऑफिसचं सर्व कार्य दादींच्याच हातात होतं. अव्यक्त बापदादांनी भांडारगृहाची जबाबदारी मुन्नी बहनजींना दिली व दादींना १९७० मधे कोलकात्याला पाठवलं. १९९० मधे बांगुर एवेन्यू येथे दादींच्या देखरेखीमध्येच भवन निर्माणाचे कार्य झाले. दादी प्रत्येक कामात मला सल्ला विचारून सन्मान देत. भवन पूर्ण झाले अन् मी मधुबनला जायला एअरपोर्टकडे निघाले. आम्ही दोघी कधीही मधुबनला एकत्र जात नसे. पण त्या दिवशी संतरी दादी म्हणाल्या, ''दीदी, मीपण बाबा मिलनसाठी येते.'' मी म्हणाले, ''अचानक कसा काय संकल्प आला?'' तेव्हा संतरी दादी म्हणाल्या, ''दोन दिवसानंतर परत येईन; पण दैवगती कुणाला ठाऊक होती? मधुबनमधे ४००० भाऊ बहिणी आले होते. १३ डिसेंबर १९९० सतगुरुवारच्या दिवशी बापदादांचे अवतरण होणार होते. परंतु त्याच दिवशी ब्राह्म मुहूर्ताचे वेळी ३ ते ४ च्या मधे योग करत संतरी दादी सूक्ष्मवतनवासी झाल्या. बाबांच्या कुशीतच शरीर सोडायची दादींची प्रबळ इच्छा होती.

***

# व्यसनमुक्त व्हा

## (भाग – २)

**ब्र.कु, लक्ष्मी, पुणे**



**वाचकहो, मागील एका भागात व्यसन या विषयावर आपण काही विचार वाचले. या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. याला सामाजिक, राजकीय, मानसिक आणि वैद्यकीय असे अनेक कंगोरे आहेत. सगळ्याच गोष्टींचा ऊहापोह साकल्याने करणे शक्य नाही, तरी त्या सर्व मुद्यांना स्पर्श करण्याच्या हेतूने हा भाग देत आहोत.**

व्यसने अनेक प्रकारची असू शकतात, उदा. तंबाखुचे व्यसन, बिडी-सिगारेट, मद्यपान, अमली पदार्थ सेवन इत्यादी. बदलत्या काळात मोबाईलचे किंवा त्यावरील व्हॉट्सअप सारख्या माध्यमाचे व्यसन हे नवे आव्हान ठरत आहे. एका पाहणीनुसार निवृत्तांमध्ये व्हॉट्सअपचे व्यसन तरुणाईपेक्षा जास्त दिसून आले आहे, कारण वेळ घालवायला एक साधन मिळाले आहे. पूर्वी दूरदर्शन हे वयस्कांसाठी गुंतवून ठेवणारे माध्यम होते. असो!

आपल्याकडे संस्कृतात म्हटले आहे – तमाखुपत्रं राजेन्द्र भज माऽज्ञानदायकम् । म्हणजे हे राजा, अज्ञान निर्माण करणाऱ्या तंबाखुचे तू सेवन करू नकोस. थोडक्यात सांगायचे तर अशा पदार्थांच्या सेवनाने मति भ्रष्ट होते.

व्यसनाधीनतेमागे अनेक कारणे असू शकतात. १) कुतूहल २) नको तिथे साहस दाखविण्याची प्रवृत्ती ३) मित्रमंडळींचा दबाव ४) वैफ़ल्यग्रस्तता आणि अज्ञान. कदाचित ही यादी अजून मोठी करता येईल.

तरुणाईत कुतूहलाचा मोठा सहभाग असतो आणि मित्रमंडळींचा दबाव हेही कारण असू शकते. मध्यमवयीन माणसाला कौटुंबिक जबाबदाऱ्या निभावताना कार्यक्षेत्रातील तणाव सहन होत नाही आणि मग व्यसनांकडे वाट वळू शकते. सर्वसाधारणपणे माणसाचा समज होतो, दारू प्यायल्याने आपण दुःख विसरून चांगली झोप घेऊ शकतो. पण वैद्यकीय शास्त्रानुसार केलेल्या निरीक्षणातून सिद्ध झाले आहे – दारू पिऊन झोपणाऱ्या माणसास 'डी हायड्रेशन' म्हणजेच शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याच्या समस्येचा सामना करावा लागतो. थोडक्यात सांगायचे तर दारूचे पचन होताना शरीराला अतिरिक्त पाण्याची आवश्यकता भासते. त्यामुळे झोपमोड होऊन नेहमीपेक्षा लवकर उठावे लागते किंवा वारंवार झोपमोड होते. अतिरिक्त मद्यपानाने प्रकृती ढासळू लागते आणि त्यातून चिंतेमुळे कुटुंबपरिवाराचीही झोपमोड होते तो भाग वेगळा. मद्यपान करून गाडी चालवणाऱ्यांमुळे अपघात होतात आणि असंख्य गुंतागुंतीच्या समस्या उभ्या राहतात. अपघातामुळे, एखाद्या कुटुंबातला कर्ता पुरुषच जर मरण पावला तर त्या कुटुंबाची किती वाताहत होते हे माहीतच आहे.

तणावातून बाहेर पडण्यासाठी किंवा मनाला काही काळ शांतता मिळावी म्हणून लोकं मद्यसेवन करतात. पण स्वतःशीच विचार करून पहा, खरोखरीच व्यसनाच्या मार्गाने तणावमुक्ती शक्य आहे का? एखाद्या प्रश्नाचा तात्पुरता विसर पडणे म्हणजे प्रश्न सुटणे असा भाबडा विचार करू नये. व्यसनाधीन माणसाच्या घरातील लहान मुलांवर काय विपरीत परिणाम होतो याचा कधी विचार केला जातो का? दूरगामी परिणाम विचारात घेतला, तर यातून गुन्हेगारी प्रवृत्तीची जोपासनाही होते. गडकऱ्यांनी 'एकच प्याला' या नाटकात विनोदनिर्मितीतून विदारक सत्य मांडले आहे. 'दारू पिणारा माणूस कधीही कुणाचा विश्वासघात करत नाही कारण त्याच्यावर कुणी विश्वासच ठेवत नाही. खिशात दमडी नसली तरी मद्यप्याला राजाचे औदार्य येते, म्हणजेच तो आपली संपत्ती उधळतो.'

(पृष्ठ क्र.१८ वर)

# परीकथा

## (भाग ७)

# शिव आणि शंकर यामधील फरक

**ब्र.कु. रेखा, देगलूर**



मी श्यामा, राधाची आई. माझी राधा आता खूप आनंदी राहत होती. तिचा हसतमुख चेहरा पाहून मन अगदी प्रफुल्लित होते. मागच्या वेळेस तिने परीकडून एक आश्वासन घेतलं होतं की मी कुठेही गेले तरी स्वप्नात येऊन गोष्ट सांगायची. त्यामुळे राधा खूप खुश होती कारण आम्ही सर्वजण महाशिवरात्रीच्या उत्सवासाठी गावी जाणार होतो. गावी खूप मोठ्या प्रमाणात शिवरात्रीचा उत्सव साजरा करतात. राधा व तिचा दादा दोघेही खूप आनंदी होते. गावी जाण्याचा आनंद काही वेगळाच असतो. बसमध्ये राधा व तिचा दादा दोघेही खिडकीजवळची जागा पकडल्यामुळे विशेष खुश होते. तिथे गेल्यानंतर काय काय करायचं याचे दोघेही वेगवेगळे आराखडे बनवत होते. आम्ही गावी पोहोचलो. राधाला गावाकडची सवय होती. अधून-मधून गावी जात असल्यामुळे गावच्या वातावरणाची तिला सवय होती. तिच्या दादाला मात्र मुळीच सवय नव्हती आम्ही बसच्या खाली उतरलो. राधाचे मामा बस स्टॉपला आले होते. मामा दिसल्याबरोबर राधा माझ्या मामाला गच्च बिलगली. घरी पोहोचलो आणि मुलं खेळण्यात खूप मग्न होऊन गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच महाशिवरात्रीचा तो दिवस सकाळी आम्ही सर्वजण लवकर उठलो राधा मात्र खूप छान निश्चित झोपली होती मी तिला उठवले, "राधा बाळ उठतेस ना! आपल्याला शिवबाबांच्या मंदिरात जायचं आहे." राधा लगेच म्हणाली, "आई थोडा वेळ झोपते ना" ! मंदिरात जायचं म्हणून सगळेजण तयार होऊ लागलो. लवकर दर्शनासाठी गेल्यामुळे मंदिरात गर्दी फार कमी होती. मंदिर फार प्राचीन होतं

आम्ही सर्वजण मंदिराच्या गाभाऱ्यात बसून थोडा वेळ योग केला मग नंतर पूजा अभिषेक सर्व खूप छान झालं होतं. दर्शन वगैरे झाल्यावर आम्ही बाहेर पडलो; पण बाहेर मुलाचा कल्लोळ ऐकू येत होता. आम्ही सर्वजण त्यांना शांत करण्यासाठी जवळ गेलो होतो पण त्याआधीच त्यांचा वाद कानावर पडत होता. सर्व मुलं शिव आणि शंकर एकच आहे असा वाद घालत होती; पण राधा मात्र म्हणत होती की शिवशंकर एक नाहीत वेगवेगळे आहेत. आम्ही सर्वजण ते काय बोलतात हे बाजूला थांबून ऐकत होतो. इथे मंदिरात शिवलिंग व बाजूलाच शंकराची मूर्ती सुद्धा होती. ती सर्वजण तिथेच बसून बोलत होती. राधाने त्या सर्वांना स्वप्नातल्या परीची कथा सांगितली ती म्हणाली, "तीन ते चार दिवसात माझ्या स्वप्नात एक परी येते. तिच्या मस्तकावर खूप सुंदर असा हिरा आहे म्हणजेच आत्मा. ती परी मला दरवेळी नवीन गोष्ट सांगते. खायला सुद्धा काहीतरी नवीन घेऊन येते." राधा पुढे बोलणार तेवढ्यात मामाची मुलगी स्वरा म्हणाली, "राधा तुझ्या परीला माझ्या स्वप्नात यायला. सांगशील का गं, किती मज्जा येईल जर माझ्या स्वप्नात परी आली तर!"

यावर राधा म्हणाली "तुम्ही सर्वांनी शिवबाबांची सकाळी संध्याकाळी आठवण केली पाहिजे. आपल्या प्रेमासाठी तो आपल्याकडे धावत आला पाहिजे." राधा आपल्या मित्र-मैत्रिणी भाऊ-बहीण यांना खूप आनंदाने परीची गोष्ट सांगत होती. राधा म्हणाली, "परीने तर मला खूप काही सांगितलं आहे; पण माझ्या जेवढं लक्षात आहे, तेवढं मी तुम्हाला सांगते. दरवेळेस परी माझ्यासाठी गोड फळ किंवा कधी खूप छान रस आणते. असे फळ / रस मी कधीच चाखले नाही. आज परीने मला शिव आणि शंकर यामधील फरक सांगितला. शिव हा निराकार ज्योतीर्बिंदू स्वरूपात आहे, शंकर आकारी देवता आहे. शंकर नेहमी ध्यान अवस्थेत बसलेला असतो. तो नेहमी कोणाचे तरी ध्यान करताना पाहतो." राधेने शंकराच्या मूर्तीकडे बोट दाखवत सांगितले, "शिव परमात्म्याने शंकराची रचना

केली. आपण बोलतानासुद्धा ब्रह्मा देवताय नमः, विष्णू देवताय नमः, शंकर देवताय नमः आणि शिव परमात्माय नमः असं म्हणतो.'' त्यावर मामाची मुलगी स्वरा म्हणाली, ''खरंच की ग राधा तुला परीने जे सांगितलं ते सत्य आहे.'' राधा पुढे म्हणाली, ''ब्रह्मा, विष्णू या देवतांप्रमाणे शंकर देवता हा सूक्ष्मपुरीत राहतो. शिव परमात्मा हा सूक्ष्मपुरीच्याही पलीकडे परमधामात राहतो. आणि हो! परी सांगत होती शंकर देवता हा केवळ सृष्टीच्या महाविनाशाचं कार्य करतो आणि शिव परमात्मा ब्रह्माद्वारे स्थापना, शंकराद्वारे विनाश आणि विष्णू द्वारे विश्वाचे संगोपन करतो.'' राधा खूप उत्साहाने सांगत होती आणि सर्वजण तिची ही गोष्ट खूप शांत होऊन ऐकत होते. राधा म्हणाली, ''मला परी पुढे म्हणाली शंकर देवता आकारी शरीरधारी आहे आणि शिव लिंग स्वरूपात आहे. लिंग म्हणजे चिन्ह किंवा प्रतीक. समजलं ना?'' त्यावर मी म्हणाले ''हो ! पण परी तू मला एक नवीन गोष्ट व खाऊ घेऊन येतेस. मी तर तुला काहीच देऊ शकत नाही.'' यावर परी हसून म्हणाली, ''तू मला तर खूप काही देतेस'' मी म्हणाले, ''ते कसं काय?'' परी म्हणाली, ''हे बघ तू माझी कथा ऐकून सर्वांना छान प्रकारे सांगतेस हेच माझ्यासाठी तू दिलेली भेट आहे. बरोबर आहे ना राधा'' एवढं बोलून परी दिसेनाशी झाली.

राधा सांगण्यात खूप मग्न झाली होती तिच्या बाबाला एकदम समोर बघितल्याबरोबर बाबा तिला जवळ घेत म्हणाले, ''राधा बाळ तू खूपच छान सांगितलं आहेस.'' बाबाही एकदम लहान मुलासारखे होऊन बसले होते. व पुढे म्हणाले, ''बाळांनो राधाला परीने जे काही सांगितलं आहे ते अगदी बरोबर आहे. आपल्यासमोरच शिव आणि शंकर आहेत आणि ते वेगळे आहेत ना. आपण सर्वजण जप करताना ओम् नमः शिवाय असं म्हणतो ओम् नमः शंकराय म्हणतो का? राधाची तिथलीच एक मैत्रीण म्हणाली, ''हो काका बरोबर आहे आपण ओम् नमः शिवाय असंच म्हणतो.'' मग बाबा म्हणाले, ''बाळांनो आपण येथे काय साजरी करत आहोत? राधा लगेच म्हणाली, बाबा आपण तर शिवरात्र उत्सव पाहण्यासाठी आलो आहोत.'' बाबा म्हणाले, ''हो बरोबर आहे. ज्ञान सूर्य शिव परमात्मा प्रकट झाल्यावर सृष्टीतील अज्ञान अंधकार तसेच विकाराचा नाश होतो. शिव हा कल्याणकारी आहे म्हणूनच आपण शिवरात्री उत्सव साजरा करतो. शंकर रात्र म्हणून साजरी करत नाही. साऱ्या विश्वात शिव परमात्मा आपल्या अलौकिक जन्माद्वारे महान परिवर्तन घडवतो. नराला श्री नारायण व नारीला श्री लक्ष्मीपद देववितो. म्हणूनच शिवरात्री ही हिरेतुल्य आहे.'' एवढं सांगितल्यावर बरोबर सर्वजण टाळ्यांचा कडकडाट केला. आणि सर्वजण बाबाला म्हणाले, ''राधेने खूप छान गोष्ट सांगितली आणि तुम्हीपण माहिती खूप छान दिलीत. राधा, बाळ तुझी गोष्ट खूप आवडली.'' राधेला मात्र सारे जण म्हणत होते. ''राधा तुझ्या परीला आमच्या पण स्वप्नात यायला सांग ना'' यावर सर्वजण हसले. माझ्या मनात शिवबाबांची आठवण आली. मी मनातल्या मनात म्हणाले,

''शिवबाबा तुझीया ठायी तन-मन-धन मी वाहिले
तुझीया नामी तुझीया धामी अखंड रंगूनी राहिले.''

तेथील सर्व कार्यक्रम उत्साहपूर्ण पार करून आम्ही मोठ्या आनंदाने घरी परतलो.

***

(पृष्ठ क्र.१६ वरुन)

कुठल्याही सवयीच्या अधीन होणे म्हणजे व्यसन म्हणता येईल, मग ते दारू असो, तंबाखू असो वा अन्य काही. शारीरिक नुकसानासोबत मानसिक नुकसान होत जाते तेही तितकेच महत्त्वाचे आहे. कुठलाही व्यसनाधीन माणूस एखादा साधा सोपा नियम जीवनात आणू शकत नाही हे दुबळ्या मनाचे प्रतीक आहे. चांगली गोष्ट मनाला पटते; पण करू शकत नाही हेच तर दुबळे मन आहे ना ! 'मद्यपिया मन स्थिर नव्हे' (संदर्भ नामदेवगाथा अभंग १८४८) असे नामदेवांनी लिहूनच ठेवले आहे.

व्यसनाधीनतेमागे असणारी चार कारणे वरकरणी वेगवेगळी वाटतात; पण त्यामागे निर्बल मन हे एकच खरे कारण आहे. मनास सशक्त करण्यासाठी राजयोगाचा खूप मोठा फायदा होऊ शकतो. राजयोग म्हणजे ईश्वराशी मन-बुद्धी जोडण्याचा विधी शिकणे आणि त्याचा नित्य अभ्यास करणे. आजवर अनेकांनी राजयोगाच्या साधनेद्वारे व्यसनमुक्त जीवन बनवले आहे. ब्रह्माकुमारी संस्थेतर्फे निःशुल्क राजयोगाचे प्रशिक्षण, स्थानिक सेवाकेंद्राद्वारे दिले जाते. तसेच संस्थेच्या वैद्यकीय विभागाद्वारे यावर उपचार करण्याची काही ठिकाणी सोय आहे. याबाबत जवळच्या राजयोग केंद्रास अवश्य भेट द्या आणि लाभ मिळवा हीच कळकळीची विनंती.

***



# "शिवबाबा : माझा पाठीराखा"

## (भाग १)

## मातेच्या सेवेला आला धावून शिवबाबा !

ब्र.कु. बापू , कोल्हापूर

**शेतकरी कुटुंबात जन्मलेले कोल्हापूर जिल्ह्यातील कांडगावचे रहिवासी ६५ वर्षीय बापूभाई अखंड ब्रह्मचारी ब्रह्माकुमार आहेत. त्यांना आजवर आलेले ईश्वरी अनुभव थक्क करणारे आहेत. आपणा सर्वांसाठी क्रमश: प्रसिद्ध करत आहोत...**

कोल्हापूरपासून १४ कि.मी. अंतरावर आमचे गाव कांडगाव आहे. शेती आणि पशुपालन हाच येथील मुख्य व्यवसाय आहे. आमचीही दोन एकर शेती असून दुधासाठी आम्ही म्हैशी पाळल्या आहेत. गावात आमची छोटी डेअरी असून दूध विक्री हा माझा प्रमुख व्यवसाय आहे. १७ नोव्हेंबर १९७९ रोजी कोल्हापूरातील मंगळवार पेठेतील मंडलीक गल्लीतील ब्रह्माकुमारीच्या सेंटरमध्ये मी साप्ताहिक कोर्स केला आणि मी बाबांचा झालो. सुरूवातीपासून अध्यात्माकडे माझा ओढा असल्यामुळे आणि बाबांच्या ज्ञानात आल्यामुळे मी ब्रह्मचारी जीवन जगत आहे.



बाबाचा बनल्यानंतर माझी खरी परीक्षा सुरू झाली. माझ्या वडिलांची तब्येत बिघडत गेली आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. मातेने काही वर्षे घर सांभाळले. पण पुढे तीच आजारी पडली. घर गृहस्थीचा सारा भार माझ्यावर पडला. आईची स्मृती कमी झाली. तिची स्वत:ची कामेही तिला करता येईनात. त्यामुळे मलाच सकाळी लवकर उठून जनावरांचे शेणघाण काढून त्यांचे वैरणपाणी करावे लागे. आईला अंथरूणावरून उचलून तिचे शौच मुखमार्जन स्नानादि करवून तिचे केस विंचरून तिला स्वच्छ अंथरूण घालून द्यावे लागे. तिला चहा नाष्टापाणी मी देई. तिचा आणि माझा स्वयंपाक करून मी दूध घालायला कोल्हापूरला निघायचे. माझी पुरती दमछाक होई.

आई म्हणायची, बापू ! तू लग्न करून घरी मला एक सून आण. ती तुझी आणि माझी सेवा करेल. पण मी तर शिवबाबाचा बच्चा बनलो होतो. त्यामुळे तिची ही इच्छा पुरी होणे केवळ अशक्य होते. अशा वेळी मी बाबाला म्हणायचो, बाबा तू अज्ञानकाळात कुणाकुणाची किती कामे केलीस! तू संतांच्या घरी पाणी भरलेस. तू कुणाची गुरे हाकलीस. कुणाचे जाते फिरविलेस. कुणाची धुणी धुतलीस. मग तू माझ्यासाठी माझ्या आईची एक इच्छा पूर्ण करशील का? तू माझ्या आईची सून होशील का?

.... आणि काय आश्चर्य ! तुम्हाला सांगतो दूध घालून कोल्हापूरातून येईपर्यंत बाबाच जणू माझ्या आईची देखभाल करायचे. मी परत येईपर्यंत आई गुपचूप अंथरूणात पडायची. मी परतल्यावर तिला जागं यायची. मग मी तिचे सगळे सोपस्कर करायचो. तिला जेवू खाऊ घालायचो. बाबाच माझ्या माघारी अदृश्य स्वरूपात माझ्या आईची सून बनून सुनेची सारी कर्तव्ये पार पाडत होते.

(पृष्ठ क्र.२१ वर)



# माझे जीवन गाणे

ब्र.कु. मनीषा, ठाणे

प्राणाहूनही प्रिय शिवबाबा जीवनात आल्यापासून जीवन जगण्याची इच्छा परत जागृत झाली.

माझा लौकिक जन्म एका ब्राह्मण परिवारात झाला. माझ्या पतीचा देहान्त होऊन तीन वर्ष होऊन गेली होती. परंतु मी स्वत:ला त्या दु:खातून बाहेर काढू शकत नव्हते. रोज मला माझ्या पतीकडे घेऊन चल अशी याचना परमेश्वराकडे करत होते. सतत मृत्यु बद्दलच विचार माझ्या मनात घोळत असत.

पूजा, अर्चना करण्यातून मनाला समाधान मिळू लागले –

लहानपणापासूनच मी रामाची भक्त होते. माझा स्वभावही भावुकच होता. माझ्या पतीचे इष्ट दैवत शिव होते, त्यामुळे त्यांच्या जाण्यानंतर मी शिवपुराण वाचू लागले. शिवपुराणात वर्णन आहे, तो भस्म आणि रूद्रास धारण करतो. त्याला मी सहज प्राप्त होतो. मला परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचा हा सहज मार्ग वाटला. त्यामप्रमाणे मी संपूर्ण अंगाला भस्म लावून रुद्राक्ष माळा परिधान करून पूर्ण विधीवत मंत्र उच्चारण करत कापूर आरती करू लागले. प्रत्येक महिन्याच्या चतुर्थी आणि अष्टमीला मी व्रत करू लागले. त्याच बरोबर मातीचे सहस्त्र शिवलिंग बनवून त्याची अतिशय मनोभावे पूजा करू लागले. त्यातही कोणती त्रुटी राहू नये याची मी पूर्ण दक्षता घेत असे. या पूजा, अर्चनेतून मला हळूहळू समाधान तर मिळू लागले, परंतु माझा उद्देश मात्र तोच होता. मला माझ्या पतीकडे लवकरात लवकर जायचे आहे.

परमेश्वरानेच मातार्जीना माध्यम बनवून मला निमंत्रण पाठवले –

लौकिकामध्ये मी लहान मुलांचे शिकवणी वर्ग घेते. एक दिवस संध्याकाळी ब्रह्माकुमारींच्या सत्य ज्ञानमार्गाचे आचरण करणाऱ्या एक माताजी शिकवणी वर्गाची चौकशी करत माझ्याकडे आल्या. माझ्या पूर्ण शरीरावर फासलेले भस्म आणि रुद्राक्ष माळा घातलेल्या बघून, माताजी आश्चर्यचकित होऊन म्हणाल्या ''हे सर्व काय आहे ? भिंतीवर एवढी देवांची चित्रे का लावून ठेवली आहेत? ईश्वर तर एक निराकार ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे.'' मी त्यांच्या म्हणण्याला दुजोरा देत म्हणाले बरोबर शिवपुराणातही ईश्वर निराकार असल्याचा उल्लेख आला आहे. परंतु मला या पूजा, पाठ, भक्ति मधूनच समाधान मिळते. माझ्याशी बोलून त्या मातार्जींना लक्षात आले की मी अतिशय दु:खी आणि निराश जीवन व्यतीत करत आहे. तेव्हा त्यांनी मला 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात' येण्याचा आग्रह केला. ''मी तुम्हाला सकाळी ९.३० वाजता घ्यायला येईन'', त्या म्हणाल्या. मी सेवाकेंद्रावर जाण्यास नकार दिला.

लाल सोनेरी रंगाची दिव्य ज्योत माझ्या डोळ्यासमोर दिसू लागली –

माताजी तर निघून गेल्या आणि आमच्या घरचे दिवे गेले. मला रोजच्या प्रमाणे पूजा करायची होती. मी जसा देवापुढे दिवा लावला तशी त्यातून लाल–सोनेरी किरण निघाले आणि माझ्या डोळ्यांपुढे फिरू लागले. काही क्षण त्या दिव्य ज्योतीचा साक्षात्कार मला होत राहिला. घरात दिवे नसल्याने ती दिव्य ज्योती अधिकच चमकत होती. या सुंदर अनुभूतीमुळे माझ्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या आणि शिव तर निराकार ज्योतीबिंदू आहे, हे त्या मातार्जींचे शब्द माझ्या कानामध्ये घुमू लागले. मला या उघड्या डोळ्यांनी साक्षात त्या निराकार दिव्य ज्योतीचा साक्षात्कार होत होता. आजही तो हिरेतुल्य क्षण माझ्या बुद्धीच्या तिजोरीमध्ये जसाच्या तसा जतन केलेला आहे. त्या दिव्य

अविस्मरणीय अनुभवामुळे मी रात्रभर झोपूच शकले नाही. "मला तुमच्याबरोबर सेंटरवर यायचे आहे." असा सकाळी उठून मी त्या माताजींना फोन केला. मी सेंटरवर पोहोचले तेव्हा शिवबाबांनी एका ब्रह्माकुमारी बहिणीला माध्यम बनवून माझा सात दिवसांचा राजयोगाचा पाठ्यक्रम करवून घेतला. कोर्स दरम्यान मला समजले, जेव्हा भक्ति पूर्ण होते तेव्हाच आपण ज्ञानमार्गात येतो. अशाप्रकारे शिवपरमात्म्याचे ज्ञान मिळवून माझे जीवन परिपूर्ण झाले.

जीवनाचे सार सापडले –

आता मी माझ्या दिव्य अनुभवाच्या आधारावर सांगू शकते, जेव्हा आपले त्या शिवपरमात्म्याशी नाते जोडले जाते तेव्हा आपल्या जीवनाच्या नावेचा नावडी बनून तो आपल्या जीवनाला पूर्णत्व देतो. आज बाबांच्या श्रीमताप्रमाणे, श्रेष्ठ संकल्पांच्या आधारे माझं जीवन आनंदमय झाले आहे. आता मी प्रत्येक श्वास, प्रत्येक संकल्प, प्रत्येक क्षण शिवबाबांच्या आठवणीत सफल करत अतींद्रिय सुखाच्या हिंदोळ्यावर जणू झुलत आहे. शिवबाबा जीवनात आल्यापासून मी आता लौकिक पतींना गमावल्याचे दुःख विसरले आहे. माझा तर आता प्राणाहूनही प्रिय, जीवाचा जिवलग शिवबाबाच आहे. आता मृत्युचा विचारही माझ्या मनाला शिवू शकत नाही. आता तर जो पर्यंत पुरुषोत्तम संगमयुग आहे तोपर्यंत बाबांच्या आठवणीत तल्लीन होऊन जगायचे आहे. "निश्चयबुद्धीचा विजय होतो" ह्या श्रेष्ठ ध्येयानी मला ज्ञानरूपी आरशात माझ्या जीवनाचे सार दिसत आहे.

ईश्वरप्राप्तीत सगळं काही मिळालं आता कोठे धावे मन!

***

## सप्तरंगी किरण

बाबा, तुझ्या योगाने सुध बुध हरले
सप्तरंगी किरण माझ्यात भरले
निळ्या निळ्या रंगाचे ज्ञानकिरण
अज्ञानी आत्म्याला अमोल ज्ञान

लाल रंगाच्या शक्ती किरणाने
विकर्म भस्म करून केलं पावन
पिवळ्या रंगानी केली सुखानुभूती
जीवनी माझ्या आनंद भरती
हिरवा रंग सुचवितो प्रेमाचं प्रतीक
साऱ्या आत्म्यां प्रती माझ्या मनी प्रीत

शांतीचा आहे आकाशी रंग
मन माझं शांतीने गेलं भरून
भगव्या रंगाची पवित्र किरणं
अमंगळापासून करते सावधान
जांभळ्या किरणांने दिला मोद
सप्तरंगाने आत्मा झाला पावन

**ब्र.कु.लता, देगलूर**

(पृष्ठ क्र.१९ वरुन)

बाबांनी ही जबाबदारी सांभाळल्यामुळे मी बिनधास्तपणे माझी शेती, दुधाचा धंदा, तसेच कोल्हापूरच्या ब्रह्माकुमारी सेंटरवरील सेवा पार पाडू लागलो. माझ्या या लोकविलक्षण मातृसेवेची चर्चा आमच्या पंचक्रोशीत सुरू झाली. लोक माझी ही सेवा कौतुकाने बघायला येऊ लागले. आजच्या कलियुगात कोण मुलगा आपल्या आईची सेवा मुलीप्रमाणे करू शकतो म्हणू लागले. पण ही किमया शिवबाबांमुळे झाली. ब्रह्माकुमारी कोल्हापूर सेंटरच्या आदरणीय सुनंदा बहेनजी यांची प्रेरणाही तितकीच महत्त्वाची होती. त्या म्हणाल्या होत्या, बापूभाई ! मातेची सेवा तुम्ही अशी करा की, बाबाची प्रत्यक्षता त्यायोगे होईल. त्यांचे बोल खरे ठरले.

क्रमशः

(शब्दांकन : ब्र.कु. प्रा. दिनेश डांगे)

***



# तणावाचे कारण आणि निवारण

ब्र.कु. भगवान, शांतीवन, आबू रोड

ज्ञानाच्या आधारे निर्णय करण्याचे कार्य बुद्धी करते आणि मन संकल्प रचण्यामध्ये नेहमी व्यग्र असते. मनामध्ये सकाळपासून रात्रीपर्यंत विभिन्न धारा उसळत राहतात. विचारधारांचा प्रभाव मनुष्याच्या जीवनावर पडत राहतो. जर बुद्धी, मनावर नियंत्रण ठेवत नसेल किंवा बुद्धी, मनाला योग्य दिशा देत नसेल तर मन इकडे तिकडे धावत राहते. सुरुवातीला अशा स्थितीमध्ये मनाला आनंद मिळतो. परंतु भटकण्यामुळे मन थकते. अनेक व्यर्थ संकल्प-विकल्प चालू लागतात. अशा मनामध्ये चालणाऱ्या अनेक संकल्प विकल्पामुळेच तणाव निर्माण होऊ लागतो.

मानसिक तणावापासूनच शारीरिक रोग होण्याची शक्यता असते. आपले मन जर नेहमी प्रसन्न राहत असेल, तर आपण रोगमुक्त राहू शकतो. वर्तमानसमयी मनाची विकृती आणि प्रदूषित वातावरण हेच रोगाचे मूळ कारण आहे असे रोगचिकित्सकांचे सुद्धा मत आहे. मन जेव्हा तणावग्रस्त असते तेव्हा पाचनशक्तिसुद्धा क्षीण होते. ग्रंथीसुद्धा ठीक कार्य करत नाहीत. त्यामुळे अनेक प्रकारचे शारीरिक रोग होण्याची शक्यता असते.

मनुष्याच्या मनामध्ये उत्पन्न होणाऱ्या नकारात्मक आणि वेगवान विचारांमुळे उत्पन्न होणाऱ्या अशांतीचा प्रभाव पूर्ण समाजामध्ये पडत असतो. म्हणूनच मानसिक, सामाजिक आणि शारीरिक रूपाने स्वस्थ राहणे हीच काळाची गरज आहे. तसे पाहिले तर प्रत्येकाचे जीवन हे ईश्वरी वरदान आहे. परंतु मनावर नियंत्रण नसेल, तर मग तेच जीवन नर्कमय सुद्धा होऊ शकते. अनियंत्रित मनामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, घृणा, वैर-विरोध इत्यादी मनोविकारांचा वास असतो. अशा मनोविकारामुळेच जीवन नर्कमय बनते. नियंत्रित मन नेहमी सकारात्मक विचार, समर्थ विचार करत असते. त्यामुळे तणावमुक्त असे मन सद्गुणांनी युक्त असते. अनियंत्रित मनाला जो जिंकतो तोच स्वर्गाची प्राप्ती करतो. इतकेच नव्हे तर अशा साधकाचे वर्तमान जीवनसुद्धा धन्य होऊन जाते. सध्या तणावापासून मनाला दूर करण्यासाठी तणावाची कारणे शोधणे आणि निवारण करण्याची गरज आहे.

व्यर्थ संकल्प-विकल्पामुळे तणाव निर्माण होतो. मनाला व्यर्थ विचार करण्याची सवय असेल तर मन शक्तिहीन होते. त्यामुळे तणाव निर्माण होतो. रोज सकाळी अमृत वेळेस उठून मनाला प्रभू चिंतनामध्ये व्यग्र करा. मी परमात्म्याची संतान आहे. परमात्मा माझा रक्षक आणि छत्रछायासुद्धा आहे. माझ्या जीवनातील प्रत्येक घटनासुद्धा कल्याणकारी आहे. तर मग मला कशाची भीती? मी निर्भय, निर्विघ्न आहे. मी आत्मा अमर, अविनाशी आहे. अशा प्रकारच्या मनातील सशक्त आणि समर्थ विचारामुळे आत्मबळ वाढते. ज्याचे मनोबल मजबूत आहे तोच आत्मविश्वासी, बनू शकतो. अशा स्थितीद्वारे कोणत्याही परिस्थितीत मनावर नियंत्रण ठेवणे सोपे जाते. मनाचा वेग स्थिरावतो. असे स्थिर मन तणावापासून दूर राहू शकते.

२) आपसातील कटुता संबंधात तणाव निर्माण होतो:- जर आपसामध्ये स्नेह किंवा सहयोगाची भावना नसेल, तर मग संबंध बिघडतात. त्यामुळे मानसिक तणाव निर्माण होतो. ज्या नाते संबंधात पारस्परिक स्नेह, सहयोग असतो तो परिवार एकसंघ राहतो. परंतु परिवारामध्ये कटुता असेल तर तिथं तणावाचा जन्म होतो. संबंधात काही इच्छा किंवा अधिकार असतात. परंतु ज्या संबंधात काही अधिकार राहत नाहीत. इच्छांची पूर्ती होत नसेल सर्व काही इच्छेविरुद्ध चालत असेल, तर मग अशा संबंधात तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. दुसऱ्याकडून काही अपेक्षा करणे, मदतीची इच्छा ठेवणे, स्नेहाची इच्छा ठेवणे हे सुद्धा

संबंधामध्ये तणावाचे मूळ कारण आहे. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, संस्कार, क्षमता वेगवेगळी असते. आपली अपेक्षा पूर्ण झाली नाही म्हणून आपण तणावाखाली येत असतो. यासाठी प्रत्येकाविषयी आपल्या मनामध्ये स्नेहाची भावना जोपासणे गरजेचे आहे. प्रत्येकाच्या गुणांचे अवलोकन करा. तरच इतरांविषयी मनामध्ये जो घृणाभाव, जागृत झालेला आहे तो निघून आपसामध्ये प्रेमभाव जागृत होईल. नाते संबंधामध्ये मधुर, नम्रचित बना, हलके रहा. इतरांच्या भावना जाणून घ्या. नि:स्वार्थ बनून इतरांना स्नेह, सहयोग द्या. प्रत्येकाला स्वतंत्र वागू द्या, तरच संबंधात आपण तणावमुक्त राहू शकतो.

३) जबाबदारीच्या ओझ्यामुळे तणाव निर्माण होतो. - प्रत्येक व्यक्तीला काही ना काही जबाबदारी असतेच. कुणाला परिवाराची, कुणाला ऑफीसची, कुणाला राष्ट्राची. जबाबदारी घेतल्यामुळेच मनुष्याच्या जीवनात अनेक गुणांचा विकास होतो. जो सफलतापूर्वक सरलतापूर्वक कार्य पार पाडतो तोच जीवनात उन्नत्ती करू शकतो. परंतु कित्येकांना जबाबदारी घेतल्यामुळे भय वाटते, त्यामुळे तणावसुद्धा निर्माण होतो. जबाबदारी त्यांना सतावते. असे लोक झोपेचेसुद्धा सुख घेऊ शकत नाहीत. एखादी व्यक्ती मदत करेल का? हे कार्य वेळेवर होईल का? हा माझे ऐकतच नाही ? अशा अनेक संकल्प-विकल्पामुळे तणाव निर्माण होतो.

अशा वेळी तणावापासून दूर राहण्यासाठी इतरांविषयी आपला दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. आपल्या जीवनामध्ये काही ना काही सिद्धांत बनवणे गरजेचे आहे. इतरांकडून चुका होत असतील, छोटे मोठे नुकसान होत असेल परंतु अशा वेळी सुद्धा आपल्या मनामध्ये सकारात्मक विचार चालावे याकडे लक्ष ठेवा.


अशा प्रकारे जबाबदारी सांभाळण्यासाठी स्वत:ला सरळचित्त बनविणे गरजेचे आहे. जितके आपण सरळचित्त बनू तितकेच कार्य सुद्धा सरळ आणि सहजच होईल. सरळचित्त बनल्यामुळे आपले व्यर्थ संकल्प चालत नाहीत आणि कार्य सुद्धा सहजच होते. कारण आपला कार्यव्यवहार संकल्पाच्या आधारे होत असतो. जर संकल्प नकारात्मक, व्यर्थ असेल तर कार्य सुद्धा असफल. संकल्प समर्थ, सकारात्मक असतील तर कार्य सुद्धा सहजच सफल होईल.

जितके आपण आत्मविश्वासी, साहसी बनू तितकेच आपली जबाबदारी सहजच पार पडू शकतो. आत्मविश्वासासोबत परमात्म्यावर सुद्धा विश्वास ठेवा कारण तोच कर्ता करविता आहे. मी निमित्त मात्र आहे. आपली जबाबदारी प्रभूला अर्पण करा, तरच आपण तणावापासून दूर राहू शकतो.

४) वर्तमान आणि भविष्याची चिंता केल्यामुळे तणाव निर्माण होतो. लक्षात ठेवा ज्यांनी वर्तमान सत्कारणी लावला आहे त्याचे भविष्य सुद्धा उज्ज्वल असणार. जो वर्तमानाला गमावतो आणि भविष्याची चिंता करतो त्याचे वर्तमान तर गेलेच परंतु भविष्यामध्ये सुद्धा तो चांगला बनू शकत नाही. चिंता करण्याऐवजी प्रभू चिंतन करणे आवश्यक आहे. वर्तमानात ईश्वरी श्रीमताप्रमाणे वागून सफल करा तरच वर्तमान, भविष्य भूतकाळ सर्व काही ठीक होईल. प्रत्येकाची इच्छा आहे माझे चांगले व्हावे परंतु इच्छे सोबत कर्माच्या गुह्यगतीला सुद्धा अंतर्मनामध्ये ठेवून कार्य करा. कर्म करणे हाच आपला अधिकार आहे. परंतु कर्मफळाची इच्छा मनामध्ये ठेवू नका. तरच आपण तणावापासून दूर राहू शकतो. गीतेचे महावाक्य नेहमी लक्षात ठेवा, जे घडत आहे ते सुद्धा चांगले, जे घडून गेले ते सुद्धा चांगले आणि भविष्यामध्ये जे घडणार आहे ते आणखीनच चांगले घडणार आहे. मग चिंता करण्याची गरजच नाही. नेहमी निश्चिंत तणावमुक्त राहा.

५) अहंकारामुळे तणाव निर्माण होतो :- अहंकारी व्यक्ती स्वत:सुद्धा त्रस्त राहते आणि इतरांनासुद्धा त्रस्त करते. अहंकारी व्यक्ती स्वत:ला चांगला आणि इतरांना चुकीचे समजत राहते. त्यामुळे ती इतरांचा सन्मान प्राप्त करू शकत नाही. उलट स्वत:च तणावग्रस्त राहते. अहंकारी व्यक्ती जिद्दी स्वभावाची असते. ती इतरांचा सल्ला घेत नाही. ती इतरांचे ऐकतसुद्धा नाही. अशा स्वभावामुळे स्वतः सुद्धा तणावामध्ये राहते आणि इतरांना सुद्धा तणावामध्ये आणते. यासाठी नम्रचित, निरअहंकारी बना. अहंकार पतनाकडे घेऊन जातो. अहंकारी व्यक्ती एकटीच राहतो. लक्षात ठेवा आपल्या जवळ जे आहे ते सर्व प्रभूची देणगी आहे. यासाठी अहंकारवश होऊन आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करू नका. अहंकारामुळे चित्त स्थिर राहू शकत नाही. अहंकारामुळे स्वभाव चिडचिडा बनतो. अहंकारी व्यक्तीला त्याची खुर्ची सुद्धा त्याला साथ देत नाही. म्हणूनच नम्रतेचे

(पृष्ठ क्र.२८ वर)



# मनाचे खाद्य - ज्ञानमुरली

**दादी हृदयमोहिनी**

''शुभ भावना आणि शुभ कामना'' ह्या विषयी बाबा कायम बोलत असत. तसेच ह्याच वाक्याचं कायम उच्चारण करत असत. कारण दुसऱ्यांप्रती शुभ कामना असणं ही गोष्ट नैसर्गिकरीत्या जीवनात अंगीकारली पाहिजे. जेवढे आपण श्रेष्ठ गुण धारण करू तेवढे आपण मायेच्या विळख्यापासून दूर राहू. जेव्हा मनामध्ये इतरांप्रती द्वेषाची भावना निर्माण होते तेव्हा आपण व्यर्थ विचारांमध्ये अडकत जातो. म्हणूनच बाबा आपल्याला सांगतात कोणाचेही अवगुण बघू नका मग आपोआप व्यर्थ विचार पण येणार नाहीत, प्रत्येकामधले श्रेष्ठ/विशेष गुण आपण अंगीकारत राहिलो तर आपसुकच कल्याणकारी, शुभविचार येत राहतील. प्रत्येक दुर्बळ आत्म्यांना आपण 'शुभभावना' व 'शुभ कामना' मनापासून दिल्या की आपोआपच आपले देखील पुण्याचे खाते वृद्धिंगत होते.

जितके आपण बाबांच्या आठवणीत राहू तेवढी आपली नियंत्रणशक्ती वाढेल आणि आपसुकच कर्मेंद्रियांवरती आपल्याला ताबा मिळवता येईल. तुम्ही पूर्ण दिवस स्वतःच स्वतःला पडताळून पाहा, निरीक्षण करा की दिवसभरात बाबांच्या आठवणीत किती असतो का इतर गोष्टी जास्त आठवतात ! उदा. माझं काम, माझे इतरांशी असलेले संबंध, माझं शरीर इ. म्हणजे तुम्ही देह आणि देहाच्या संबंधामध्येच गुरफटला आहात का, जेव्हा तुम्ही 'माझा बाबा' म्हणता, तेव्हा पण माझा, मी, माझं ह्या शब्दाकडेच आपलं लक्ष केंद्रित होतं, हो ना ! म्हणूनच माझा, माझा म्हणणारा 'मी' आत्मा, ''स्वराज्य अधिकारी आहे.'' हे विसरता कामा नये, हे कायम लक्षात ठेवलं पाहिजे. बाबा म्हणतात, मुलांनो आता ह्या सृष्टीचक्राचा शेवट आता जवळ आला आहे, तेव्हा स्वतःच आत्मपरीक्षण करा! आपल्याला देवदूत (फरिश्ता) बनून देवता बनायचं आहे, तर मग पडताळून पहा. आपण कितपत देवदूत (फरिश्ता) पदापर्यंत पोहोचलो आहोत? त्याचबरोबर हे पण बघा की आपण ''स्वराज्य अधिकारी'' बनलो आहोत का? आपण कितपत लक्ष्य साध्य केलं आहे, या गोष्टी जरूर तपासून पाहा. बाबा म्हणतात, देवदूत, (फरिश्ता) बनणे सहज, सोपे आहे. फक्त तुमच्या सगळ्या जबाबदाऱ्या बाबांवर सोपवून निश्चिंत रहा. आपले व्यर्थ विचार, वायफळ बडबड/विनाकारण इतर विषयांचे विवेचन करणे. असल्या निरुपयोगी, आवश्यक नसलेल्या गोष्टींचे ओझे का बरे तुम्ही घेता, त्यापेक्षा ''व्यर्थ विचारांना विराम देऊन समर्थ/श्रेष्ठ विचारांची जोपासना'' का बरे करत नाही?

बाबा कायम सांगत आले आहेत की, सकाळची मुरली सेंटरवर जाऊन ऐकणे चांगले, सकाळीच आत्म्याला ज्ञान अमृत दिलं पाहिजे म्हणजे आपलं मन ज्ञानाच्या मनन, चिंतनात व्यग्र राहील. नाहीतर म्हणतात ना, ''खाली दिमाग शैतान का घर'' (रिकामं डोकं भूताचं घर). मनाला बाबाच्या मुरलीमध्ये, मनन, चिंतनामध्ये व्यग्र ठेवा अशा प्रकारे आपले व्यर्थ विचार; पण कमी होण्यास मदत होईल.

बाबांची मुरली केवळ ऐकायची किंवा नुसतीच वाचायची नाही, तर बाबाने जे सांगितलं आहे तसं करायचंदेखील आहे, आपल्या नित्य जीवनात त्याचा फायदा करून घ्यायचा आहे. जितके आपण शुद्ध विचार, मनाला देऊ तेवढी आत्म्याची देखील ताकद वाढेल. मुरलीवर आपलं खूप प्रेम असलं पाहिजे, तेव्हा बाबा म्हणतात तुमचं माझ्यावर देखील तेवढंच प्रेम आहे, कारण बाबां (ब्रह्मा) चे मुरली वरती जीवापाड प्रेम आहे आणि तुमचं (मुलांचं) बाबा वरती प्रेम आहे, हो ना ! म्हणूनच जे बाबांना आवडतं ते मुलांना देखील आवडतं. बाबांवरती मुलांचं प्रेम तसेच बाबांच्या महावाक्यांवर प्रेम, दृढ विश्वास असणे ह्यालाच बाबा ''श्रीमंती'' म्हणतात.

(पृष्ठ क्र.२८ वर)

# सेवावृत्त - १

## दीपावली आणि ब्रह्माकुमारीज संस्थेचा ८५ वा वार्षिकोत्सव शांतिवन, आबू रोड.

### विषय : भारत देशाचे सशक्तीकरण आणि येणाऱ्या काळात देशाची सुवर्णयुगाकडे वाटचाल

२५ ऑक्टोबर २०२२ रोजी शांतिवन (आबू रोड) येथील डायमंड हॉलमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास भारताचे मा. उपराष्ट्रपती भ्राता जगदीप धनखड हे प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवराचे यथोचित स्वागत करण्यात आले. तत्पश्चात् स्वागत गीत व स्वागत नृत्य सादर करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमाचे कुशल सूत्र संचालन ब्र.कु. शिविका (दीदी) यांनी केले.



शांतीवन आबू रोड – ब्र.कु. शिविका, ब्र.कु. मृत्युंजय, ब्र.कु. मुन्नी दीदी, भगिनी सुदेशजी धनखड, उप–राष्ट्रपती भ्राता जगदीपजी धनखड, ब्र.कु. बृजमोहन आणि अन्य

१) ब्र.कु. डॉ. मृत्यूंजयजी – भ्राताजी संस्थेचे कार्यकारी सचिव आहेत. त्याचबरोबर ते संस्थेच्या प्रमुख कार्यकारी समितीचे सदस्य, एज्युकेशन विंग चे अध्यक्ष आणि अनेक जबाबदाऱ्या यशस्वीरित्या सांभाळत आहेत. त्यांनी आपल्या स्वागतपर गौरवोद्गारात म्हटले, "भारत देश गौरवशाली, समृद्ध आणि सशक्त करण्यासाठी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांनी अनेक योजना व अभियान (उपक्रम) सुरु केले आहेत. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि त्या अनुषंगाने अनेक कार्यक्रम १५ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२३ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहेत. ब्रह्माकुमारीज संस्था व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आजपर्यंत १५,००० पेक्षा अधिक कार्यक्रम संपन्न झाले आहेत. पुढेही ती मालिका अशीच सुरू राहील आणि यांद्वारे अनेक लोकांना ईश्वरी संदेश देता येईल असा विश्वास व्यक्त केला. या ईश्वरीय विश्व–विद्यालयाने आतापर्यंत अनेकविध उपक्रमांद्वारे जनमानसात शांतीचा संदेश व मानवी जीवनांत, राजयोगाचे महत्त्व विशद केले. या विद्यालयाच्या कार्याबद्दल आजपर्यंत विविध राजकीय नेते, विधिज्ञ, न्यायमूर्ती, सामाजिक कार्यकर्तेयांनी गौरवोद्गार काढले आहेत. विशेष करून न्या. श्री. रंगनाथ मिश्रा (२१ वे माजी सरन्यायाधीश, भारत सरकार) यांनी एका कार्यक्रमांत असे म्हटले आहे की, आपल्या देशात विविध विषयांवर अभ्यास करण्यासाठी विद्यापीठे उपलब्ध आहेत परंतु प्र.ब्र.कु.ई.वि.वि. हेच एकमेव विद्यापीठ आध्यात्मिक शिक्षण देण्याचा वारसा चालवित आहे. मूल्यनिष्ठ समाज निर्माण करण्यासाठी या विद्यालयाने आतापर्यंत २३ विद्यापीठांबरोबर करारनामा करून जीवनमूल्ये अभ्यासक्रमात समाविष्ट केली आहेत. तसेच या संस्थेस UNO तर्फे शांति प्रस्थापनेसाठी केलेल्या कार्याबद्दल ६ आंतर्राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले आहे. आजमितीस हे विद्यालय १४० देशांत शांतीचा / राजयोगाचा प्रसार करीत आहे. जवळजवळ ३०,००० पेक्षा जास्त भगिनींनी ह्या कार्यास आपले संपूर्ण जीवन अर्पित केले आहे.

२) ब्र.कु. जयंती दीदी – लंडन (डायरेक्टर – युरोप)

दीपावली हा सण भारताप्रमाणेच, इंग्लंड–लंडन येथे ही ४०,००० पेक्षा जास्त लोकांनी साजरा केला.

सद्यपरिस्थितीत, ताण-तणावातून मुक्त होण्यासाठी अनेक प्रकारचे उपाय योजले जातात. यामध्ये राजयोगाबद्दल जाणून होण्यास अनेक लोग उद्युक्त होत आहेत. भारत देशाने जणू संपूर्ण विश्वाला राजयोगाची भेटच दिली आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यांनी राजयोगाचा प्रत्यक्ष अभ्यासही करून घेतला.

३) ब्र.कु. करूणाभाईजी (मिडीया विंग प्रमुख).

भारतांत ज्योतिर्लिंगाचे गायन आहे, परमात्यास - त्वमेव माता च पिता त्वमेव... असे संबोधिले जाते. आपण स्वत: एक चैतन्य ज्योतीस्वरूप आत्मा आहोत हीच स्मृती कायम ठेवावी. आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत हाच संदेश व हीच भावना सर्व विश्वाला एकत्र ठेवेल आणि येणाऱ्या काळात भारत विश्वगुरु बनेल अशी भावना व्यक्त केली.

४) ब्र.कु. बृजमोहनभाईजी (अतिरिक्त सचिव प्र.ब्र.कु. ई.वि.वि.) भ्राताजींनी मा. उपराष्ट्रपतींबद्दल गौरवोद्‌गार काढले. भ्राता धनकरजी हे सुप्रसिद्ध विधिज्ञ आहेत. अनेक राष्ट्रीय व आंतर्राष्ट्रीय तंटे/विवाद यशस्वीपणे सोडविण्यात योगदान दिले आहे.

आध्यात्मिक उन्नतिसाठी पुढील नियमांकडे त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

अ) Nothing in this world exists for itself. म्हणजे या जगात कुठलीही गोष्ट किंवा कोणाचेही अस्तित्त्व हे फक्त स्वत:पुरते मर्यादित नाही. ते नेहमीच अन्य कोणासाठी तरी उपयुक्त आहे.

आ) या जगात कायमस्वरुपी आपण कुठल्याही गोष्टींवर मालकी हक्क प्रस्थापित करू शकत नाही. परंतु आपण फक्त त्याचा योग्य तो वापर करू शकतो.

इ) कुठलेही ऐहिक सुख/ऐश्वर्य आपल्याला सदा सर्वदा सुखी ठेऊ शकत नाही.

संपूर्ण शाश्वत सुखासाठी आध्यात्मिक ज्ञान हाच एकमेव मार्ग आहे. शरीर नाशवंत आहे आत्मा अविनाशी आहे. आत्मिक गुण व शक्तिंचा विकास हाच शाश्वत सुखाचा राजमार्ग आहे.

५) मा. उपराष्ट्रपती भ्राता जगदीप धनखडजी -

मा. धनखडजींनी सर्व उपस्थितांना दीपावली व नववर्षांच्या शुभेच्छा दिल्या. ब्रह्माकुमारीज संस्थेच्या या आमंत्रणाबद्दल मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो व येथे उपस्थित राहणे हा माझा स्वत:चा सन्मान आहे असे मानतो. श्री. धनखडजींनी सर्व पूर्व वक्त्यांबद्दल कौतुकोद्‌गार काढले.

जयंतीदीदी - ज्ञानसंपन्न श्रीमंत आहेत.

बृजमोहनजी - अत्यंत विद्वत्तापूर्ण रीतीने जणू गीतेचे तत्वज्ञान सार रूपात वर्णिले.

करुणाजी - मिडिया द्वारे समाज परिवर्तनात महत्त्वपूर्ण योगदान

मृत्यूंजयजी - महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच मूल्यनिष्ठ समाज घडविण्यातील योगदान.

भारत देश पुन्हा आपली वाटचाल सुवर्णायुगाकडे करीत आहेत, त्या अनुषंगाने प्रगती सुरू आहे. आपण भारतीय आहोत ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. मा. पंतप्रधानांनी १८ कोटी परिवारांपर्यंत गॅस कनेक्शन उपलब्ध केली ही एक मोठी क्रांती घडविली.

ज्या इंग्रजांनी आपल्यावर राज्य केले, त्यांच्या अर्थव्यवस्थेपेक्षाही आपली प्रगती आली आहे आणि आज आपली अर्थव्यवस्था जगातील पहिल्या ५ मध्ये आहे आणि लवकरच ती जगातील ३री अर्थव्यवस्था होईल यात शंका नाही.

भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञान निश्चितच जगाला मार्गदर्शक ठरेल. भारताने नेहमीच नैतिक मूल्य जपली आहेत. ज्याने कधीही आपला भूभाग विस्तारण्यासाठी दुसऱ्या देशांवर आक्रमण केले नाही, असा इतिहासातील भारत हा एकमेव देश आहे.

भारत देश नक्कीच आपल्या उत्थानाकडे अग्रेसर होत आहे. त्यात आध्यात्मिक शिक्षण, मोलाची कामगिरी करीत आहे. धर्म ही संकल्पना म्हणजे फक्त एक जाती, पंथ/मजहब नाही तर धर्म म्हणजे मानवता धर्म.

ब्रह्माकुमारीज संस्था हेच कार्य गेल्या ८५ वर्षांपासून करीत आहे आणि ते एक अद्वितीय उदाहरण जगासमोर ठेवत आहे असे मी मानतो.

पर्यावरण सुरक्षा आणि संवर्धन यासाठी ही संस्थेतर्फे केलेल्या उल्लेखनीय योगदानाचे मी कौतुक करतो.

संस्थेला आतापर्यंत प्राप्त झालेल्या अनेक पुरस्कारांबद्दल मी मन:पूर्वक आनंद व्यक्त करतो. या संस्थेचा प्रत्येक सदस्य हा एक सच्चा शांतीदूत आहे असे मला वाटते.

मी राज्यसभेचा अध्यक्ष या नात्याने सर्व सभासदांना या कार्याबद्दल परिचित करवेन व त्यांनाही देशाच्या संपूर्ण

# सेवावृत्त - २

## माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य भ्राता भगतसिंग कोश्यारी ह्यांच्या शुभहस्ते 'दया आणि करुणा' ह्या विषयावरील संमेलनाचे उद्‌घाटन.

### आयोजक - प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्व विद्यालय, मुलुंड, उपविभाग.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुलुंड उपविभागातर्फे दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी 'दया व करुणा याद्वारे आध्यात्मिक सशक्तीकरण' या विषयावर मुलुंड, मुंबई येथील दयानंद विद्यालय मैदान, चंदनबाग येथे संमेलन आयोजित करण्यात आले होते. भारत सरकार द्वारा घोषित भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यातील एक भाग म्हणून प्र.ब्र.कु.ई.वि.वि. तर्फे दया व करुणा याद्वारे आध्यात्मिक सशक्तीकरण हा कार्यक्रम जगभरात वेगवेगळ्या प्रकारे करण्यात येत आहे. कार्यक्रमासाठी मुख्य पाहुणे आणि उदघाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल भ्राता भगतसिंग कोश्यारी उपस्थित होते.



मुलुंड – मा. राज्यपाल भगत सिंह कोश्यारीजींचे स्वागत करताना ब्र.कु. लाजवंती, भ्राता संदीप नेने, कु. देवांश नेने आणि अन्य

राष्ट्रगीताने कर्यक्रमाची सुरुवात झाली. माननीय राज्यपाल व इतर प्रतिष्ठितांचे पुष्पगुच्छ, शाल आणि पगडी देऊन स्वागत करण्यात आले. स्वागत नृत्य आणि दीप प्रज्वलनांनंतर ब्र. कु. लाजवंती यांनी सर्वांचे शुभेच्छा देऊन स्वागत केले.

ब्रह्माकुमारीजचे अतिरिक्त सचिव ब्र. कु. मृत्युंजय भाई यांनी आपल्या भाषणात भारतास विश्वगुरू संबोधले जाते, अशी आठवण करून दिली. परमात्म्याच्या श्रेष्ठ मतानुसार, जर महाराष्ट्र आणि भारतातील प्रत्येकाने आपल्या आचरणांत दया, करुणा पवित्रता, अशा दिव्य गुणांचा समावेश केला, तर हा संदेश साऱ्या विश्वात पोहोचण्यास तसेच विश्वशांती स्थापन होण्यास वेळ लागणार नाही. असा विश्वास प्रकट केला.

ब्रह्माकुमारी मुलुंड उपविभागाच्या संचालिका आदरणीय राजयोगिनी गोदावरी दीदी यांनी सामुदायिक प्रतिज्ञा करविली. प्रत्येक संकल्प, बोल आणि कर्म करत असताना मी ईश्वराच्या आठवणीत राहीन. एकाच पित्याची लेकरे या नात्याने मी सर्वांशी दया, करुणा आणि प्रेमाने व्यवहार करेन. सर्व धर्म समभावाचा अंगीकार करेन. तसेच मत्सर आणि वैरभावनेचा त्याग करेन. सर्वांच्या कल्याणाकरिता शुभ भावना ठेवेन. कुटुंबात शांतता ठेवण्याचा प्रयत्न करेन. मी रोज किमान दहा मिनिटे परमात्म्याच्या आठवणीत व्यतीत करेन. या प्रतिज्ञांचा यात समावेश होता.

त्यानंतर मा. राज्यपालांनी संस्थेतर्फे तयार केलेल्या स्वर्णिम भारत की ओर (स्वर्णिम भारताकडे वाटचाल) या स्मरणिकेचे प्रकाशन केले. स्वातंत्र्यप्राप्तीच्या अमृत महोत्सवानिमित्त माननीय पंतप्रधानांनी जो कार्यक्रम घोषित केला आहे, त्यानुसार ब्रह्माकुमारी संस्थेने पुढाकार घेऊन संपूर्ण भारतभर अनेक कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले आहेत, याबद्दल त्यांनी संतोष व्यक्त केला. ज्या कुटुंबात मातृशक्तीचा मान ठेवला जातो, त्या कुटुंबाचा

निश्चित विकास होतो. याबाबतीत ब्रह्माकुमारी हे मूर्तिमंत उदाहरण आहे. याच दिशेने वाटचाल केली, तर कुटुंब, समाज, देश यांचा नक्कीच विकास होईल अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास आमदार भ्राता मिहीर कोटेचा, यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. त्याचप्रमाणे खासदार भ्राता मनोज कोटक यांनीही आपल्या शुभेच्छा, पत्राद्वारे कळविल्या होत्या.

समाजरत्न भ्राता नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या कार्यक्रमाचे कौतुक केले तसेच समाजोद्धारासाठी ब्रह्माकुमारीज करत असलेल्या कार्याचा गौरवही केला. उद्योगपती भ्राता राजेश अनम यांनी आपल्या भाषणात राज्यपालांच्या हस्ते विविध क्षेत्रात प्रावीण्य व बक्षिसे मिळविणाऱ्या मुलांचेही कौतुक केले.

या कार्यक्रमात मुलुंड व आसपासच्या परिसरातील शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा मा. राज्यपाल व इतर प्रतिष्ठितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गेल्या वर्षभरात अभ्यास, कला, क्रीडा, अभिनय अशा विविध क्षेत्रात ज्या विद्यार्थ्यांनी देदीप्यमान यश संपादन केले, अशा ७५ विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे खास भेटवस्तू व मानपत्र प्रदान करण्यात आले. ब्र. कु. डॉ. राजकुमार कोल्हे यांच्या आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

***

---

(पृष्ठ क्र.२३ वरुन)

कवच नेहमी धारण करा, तरच तणावापासून दूर राहाल. नम्रचित्त व्यक्ती सर्वांना आपला मित्र मानते. ती कधी लहान थोराचे भेद करत नाही. अशाप्रकारे सर्वांशी प्रेमयुक्त व्यवहार करणाराच तणावमुक्त राहू शकतो.

यासाठी तणावग्रस्त होऊन शरीराच्या आणि मनाच्या शक्तिला भस्मीभूत न करता स्वतःला तणावाच्या पंजापासून वाचवा. परिस्थितीला दोष न देता आपली स्थिती श्रेष्ठ बनवा. आपल्या मनाची विकृती ही खरी आपल्या जीवनाची सुद्धा समस्या बनली आहे. यासाठी मनाच्या विकृतीला दूर करून मनोबल वाढविण्यासाठी आणि मनाला योग्य दिशा देण्यासाठी ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यालयामध्ये राजयोगाचे निःशुल्क प्रशिक्षण दिले जाते. रोज ईश्वरी महावाक्यांचे श्रवण, राजयोगाचा यथार्थ अभ्यास आणि श्रीमताचे पालन केल्यास मनोबल, आत्मविश्वास वाढतो. आध्यात्मिक पातळीवर विचार केल्यास जाणवते, 'मी आणि माझे' या दोन शब्दांमुळे तणाव निर्माण होतो. त्याजागी मीही ईश्वराचे आणि माझे सगळे म्हणजे 'देणे ईश्वराचे' हा भाव ठेवल्यास तणावमुक्तीची वाटचाल सोपी होते.

***

---

(पृष्ठ क्र.२४ वरुन)

ही श्रीमंतीही आपल्या जीवनात खूप महत्त्वाची आहे, बाबांच्या श्रीमताचं पालन कसं करायचं? अमृतवेळेपासून दिनचर्या कशी असली पाहिजे ह्याचे आपल्याला बाबांनी श्रीमत दिले आहे. शरीराला कष्ट न देता सहजपणे बाबांच्या आठवणीत राहायचे असेल तर प्रत्येक कर्म हे श्रीमतानुसार झालं पाहिजे, आपल्या प्रत्येक इंद्रियावर ताबा असला पाहिजे. आपण डोळ्यांनी काय व किती योग्य निरीक्षण करतो, म्हणजेच आपण काय बघतो, तसेच मुखावाटे काय बोलतो ह्या प्रत्येक गोष्टीवर सखोल मार्गदर्शन केले आहे, त्याचप्रमाणे आपण वागतो का? हे जरूर पडताळून पहा की, बाबांनी ज्याप्रमाणे, नम्रतेने मधुर आवाजात, योग्य तेच बोलायला सांगितलं आहे त्यानुसार मी कर्म करतो का? तसेच इतरांकडे बघताना माझं लक्ष शरीराकडे तर जात नाही ना? आत्म्याचं भान माझ्यामध्ये आहे ना, बाबांच्या श्रीमतवर आपण चालत असाल तर निश्चिंत रहा, मग तुम्ही आपल्या (लक्ष्मी–नारायण) बनण्याच्या उद्दीष्ट प्राप्तीपर्यंत सहज पोहोचाल, ते साध्य करू शकाल.

**(भावानुवाद – ब्र.कु. पंकज, पनवेल)**

***

***



मुलुंड : कोरोना काळात केलेल्या सेवेबद्दल कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीतर्फे 'डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी' या पदवीने सन्मानित ब्र.कु. लाजवंती, ब्र.कु. सरला



जकातवाडी सातारा : जलशक्ती अभियान उपक्रमास भेट दिल्यानंतर नोडल अधिकारी भ्राता जे.पी. पांडे, ब्र.कु. शांता व जल संसाधनचे अधिकारी



चिखली : हृदयरोग तज्ज्ञ डॉ. रामेश्वर दळवी यांचा सत्कार करताना ब्र.कु. मंगला, शेजारी डॉ. रवींद्र कमळस्कर



रविवार पेठ, पुणे : सेवाकेंद्राच्या वर्धापन दिनानिमित्त आयुक्त भ्राता विलास कानडे व अधिकारी वनिता कानडे यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. सुनंदा व ब्र.कु. सुनीता



शेगाव : नगरपालिका मुख्याधिकारी जयश्री काटकर यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. शारदा, ब्र.कु. अनिता




वसई : माजी आमदार भ्राता हितेंद्र ठाकूर यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. प्रफुल्ला

Registration No. : MAHMAR/2007/21914



मुलुंड : 'दया आणि करुणेद्वारे आध्यात्मिक सशक्तीकरण' या कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी दीप प्रज्ज्वलन करताना मा. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, ब्र.कु. मृत्युंजय, ब्र.कु. गोदावरी दीदी, ब्र.कु. लाजवंती व आमदार मिहीर कोटेचा



बोरिवली (पूर्व) : कार्यक्रमानंतर ग्रुप फोटोत सुप्रसिद्ध गायक भ्राता सुदेश भोसले, ब्र.कु. शिवानी, ब्र.कु. दिव्यप्रभा



मुलुंड : मुलुंड सबझोनच्या सेवाकेंद्राच्या वार्षिकोत्सव प्रसंगी राजयोगिनी ब्र.कु. गीता व ब्र.कु. गोदावरीदीदींचा सन्मान करताना अन्याय निवारण निर्मूलन समितीचे अध्यक्ष भ्राता राजाभाऊ शेठ.



बाणेर, पुणे : राज्यपाल भ्राता भगतसिंह कोश्यारी यांच्याकडून लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस्‌चा पुरस्कार प्राप्त करताना ब्र.कु. त्रिवेणी, ब्र.कु. दीपक हरके व अन्य



वाशी : श्री महंत जन्मेजय शरण महाराज यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. शीला, ब्र.कु. शुभांगी, ब्र.कु. मीरा



चंद्रपूर : समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. कुंदा, ब्र.कु. सीता, ब्र.कु. दशरथ, ब्र.कु. सतीश